**अतारांकित प्रश्नोत्तरांची ४२ वी यादी**

# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### नागपूर येथे विकसित करण्यात येत असलेल्या वॉकेबल स्ट्रीटबाबत

**(१) ७३८१ (२३-०८-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे आंतरराष्ट्रीय शहराच्या धर्तीवर व्हीएनआयटी जवळच्या बजाजनगर गेट ते कांचीपूरा चौकापर्यंत "वॉकेबल स्ट्रिट" अनेक महिन्यांपासून विकसीत केले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संकल्पनेत पादचाऱ्यांसाठी सुरक्षित वाहतूक आणि सार्वजनिक जागांचे सुशोभिकरण यांचा समावेश असून या कामात कंत्राटदाराला वारंवार मुदत वाढ देऊनही काम पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर काम जलदगतीने पूर्ण व्हावे, यासाठी कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०३-२०२६) :** (१) अंशतः खरे आहे.

मध्य नागपूरमधील बाजीराव रोडवरील काही दुकानदारांनी दुकानासमोर पायरी आणि ओट्याचे अनधिकृत बांधकाम केले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सदरचा भाग हा मार्केट व्याप्त असल्यामुळे हा परीसर दाटीवाटी व वर्दळयुक्त आहे. तसेच येथील गल्ल्या अरूंद असल्याने येण्या-जाण्यास अडचणीचे होवून वाहतुक कोंडी होते.

(३) प्राप्त तक्रारीनुसार मध्य नागपुर येथील बाजीराव रोड या परिसराची पाहणी करून अनधिकृत बांधकाम करणा-या काही मालमत्ता धारकास लोककर्म विभाग, सतरंजीपुरा झोन तर्फे पत्र देवुन दुकानदारांचे अनधिकृत ओटे, पाय-या तोडण्यात आले आहेत. तसेच उर्वरीत दुकानदारांवर अनधिकृत ओटे/पायऱ्या काढण्याची कारवाई सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वसई (जि.पालघर) तालुक्याला जोडणाऱ्या भिवंडी तालुक्यातील चिंचोटी - कामण - भिवंडी रस्त्याची झालेली दुरवस्था

**(२) ७५७६ (०५-१२-२०२५). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्याला जोडणाऱ्या भिवंडी तालुक्यातील चिंचोटी - कामण - भिवंडी रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे

खरे आहे काय,
(२) असल्यास, वसई विरार परिसरातील नोकरदार, कामगार, उद्योजक यांना या रस्त्यावरून रोज कामानिमित्त कराव्या लागणाऱ्या प्रवासामुळे नागरिकांचे हाल होत असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी याबाबतचा वारंवार पाठपुरावा करून ही रस्त्याचे काम अदयाप सुरू झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार सदर रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१३-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. सदर रस्त्याचे कॉक्रिटीकरणाचे मंजूर कामाचे कार्यारंभ आदेश दिनांक ०४.११.२०२५ रोजी निर्गमित करण्यात आले असून सद्यस्थितीत काम प्रगतीत आहे. सदरचे काम दिनांक १९.०१.२०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर शहरातील नदी आणि नाल्यांमध्ये प्लास्टिक कचऱ्याचे ढीग साठल्याने पुराचा धोका निर्माण झाला असल्याबाबत

**(३) ७६९० (०८-०९-२०२५). श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील नाग, पिवळी, पोहरा नदी परिसरातील मोकळया भागात पाण्याच्या प्रवाहात अडथळा निर्माण होईल अशा पद्धतीने मोठ्या प्रमाणात प्लास्टिक कचरा साठला असल्यामुळे पुराचा धोका निर्माण झाल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पंचशील टॉकीज च्या मागून येणाऱ्या नाग नदीवर बांधलेल्या पुलाजवळ पाण्यात जलपर्णी निर्माण झाल्यामुळे प्रवाहाला अडथळा निर्माण झाला असून दीप नगर मध्ये नाल्याच्या मोकळया भागात कचऱ्याचे ढीग साठल्याने स्थानिक नागरिकांनी नदी नाले सफाईबाबत स्थानिक प्रशासनाकडे वेळोवेळी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पावसाळ्यापूर्वी नदी व नाल्यांवरील अतिक्रमण हटवून सर्व प्रकारची जलपर्णी आणि कचऱ्याचे ढीग हटवून सफाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

नागपूर शहरातील नाग, पिवळी, पोहरा नदी परिसरातील उघड्या भागात पाण्याच्या प्रवाहात अडथळा निर्माण होणार नाही, यास्तव नद्या स्वच्छता अभियान राबविण्यात आले असून, नद्यांच्या एकुण लांबी पैकी नागनदी ९७.५३%, पिवळी नदी ९८.७९%, व पोहरा नदी १००% प्रवाह सुरळीत करण्याचे काम पुर्ण झालेले आहे.

(२) हे खरे नाही.

पंचशील टॉकीज च्या मागे सेंट्रल मॉल कडून येणाऱ्या नाग नदीतील जलपर्णी काढण्यात आली असून

सध्या या ठिकाणी पाणी वाहून जाण्यास काही अडथळा नाही. दीप नगर परिसर प्रभाग क्र. २९ अंतर्गत परिसरात कोणतीही नदी किंवा नाला नाही. प्रभाग क्र. २९ अंतर्गत बेसा पावर हाऊस पासून नरसाळा गावापर्यंत जाणाऱ्या नाल्याचा प्रवाह सुरळीत सुरू आहे.

(३) नागपूर महानगरपालिकेद्वारा दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२५ पासून नदी स्वच्छता अभियानास सुरुवात करण्यात आली आहे. मागील वर्षी नागपूर शहरातील नदी व नाल्यावरील १५५ अतिक्रमणे काढण्यात आली असून सदर जागेवर अतिक्रमणे पुन:श्च करण्यात आली आहे किंवा नाही याबाबत सर्वेक्षण करण्यात आले असून सदर सर्वेक्षणात अतिक्रमण झाले नसल्याचे आढळून आले आहे. तसेच स्वच्छता अभियानात नागपूर शहरातील मुख्य तीन नद्यांचा समावेश असून पोकलेन द्वारे नद्यांमधून गाळ, जलपर्णी, गवत/हिरवळ काढून नद्यांची स्वच्छता करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील भांडूप पूर्वे कडून पश्चिमेस जाण्याकरिता जोडणाऱ्या उड्डाणपुलाबाबत

**(४) ७७५० (१८-०८-२०२५). श्री.सुनील राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भांडूप पूर्वे कडून पश्चिमेस जाण्याकरिता नाहूर मार्गावरुन जावे लागत असून भांडूप पूर्व येथे पेट्रोल पंप नसल्यामुळे नागरिकांना पेट्रोल भरण्याकरीता पश्चिमेस मोठा वळसा घालून पेट्रोल भरण्याकरिता जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भांडूप पूर्व-पश्चिमेस जोडणारा मोठा उड्डाण पुल बांधण्याबाबत नागरिकांसह वाहन चालकांकडून सातत्याने मागणी होत असून यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबधित विभागाकडे पत्रव्यवहार देखील केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीनुसार भांडूप पूर्व-पश्चिमेला जोडणाऱ्या उड्डाण पुलाबाबत प्रस्ताव तयार करुन मान्यतेकरिता पाठविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त उड्डाण पुल बांधण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

सदर भांडुप पूर्व व पश्चिमेस जोडणाऱ्या उड्डाणपुलाचा प्रस्ताव मंजूर करून काम करण्याचे कार्यादेश दिलेले आहे. सदर पुलाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विक्रोळी पूर्वविधानसभा क्षेत्रातील सुर्यानगर येथे जलकुंभ बांधण्याबाबत

**(५) ७७७६ (०८-०९-२०२५). श्री.सुनील राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विक्रोळी पूर्व येथील सुर्यानगर हा भाग डोंगरावर वसलेला असल्याने उंचवटयावर पाणी पुरवठा होण्यास अडचणी निर्माण होत असल्याने रहिवाशांना पाण्यासाठी प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे

आहे काय,
(२) असल्यास, रहिवाश्यांचा पाण्याचा प्रश्न सुटण्यासाठी डोंगरावर भागात जलकुंभ बांधून दिल्यास पाण्याचा प्रश्न सुटणार असल्याने या भागात जलकुंभ बांधुन देण्याबाबत शासन स्तरावर निधी उपलब्ध करुन जलंकुभ बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२६) :** (१) हे अंशतः खरे आहे.
(२) सद्य:स्थितीत सुर्यानगर, विक्रोळी (प) या विभागात दुपारी १२:०० ते रात्री १०.३० या वेळेत गुरुत्वाकर्षण पद्धतीने व उंचावरील डोंगराळ भागात क्रांती मैदान येथील महापालिकेद्वारे प्रचालन करण्यात येणाऱ्या सहाय्यक शोषण टाकी व उदंचन केंद्राद्वारे दुपारी ३:०० ते सायं. ७:०० या वेळेत पाणीपुरवठा करण्यात येतो. सुर्यानगर पश्चिमेकडील बराचसा भाग हा उंचवट्यावरील डोंगराळ भाग असल्याने अतिउंचावरील डोंगराळ भागात काही प्रमाणात पाण्याच्या समस्या असून त्यामध्ये सुधारणा करण्याकरिता तुर्तास नवीन १५० मि.मी. व्यासाची जलवाहिनी टाकण्यात आली असून सदर जलवाहिनी कार्यान्वित करण्यात आलेली आहे. त्यामुळे पाणीपुरवठ्यामध्ये सुधारणा झाली आहे व सद्य:स्थितीत सदर ठिकाणचा पाणीपुरवठा सुरळीत आहे.
तसेच सूर्यानगर येथील अतिउंचावरील डोंगराळ भागात पाणीपुरवठ्याच्या समस्येचे निराकरण करण्याकरिता टोटल स्टेशन सर्वेक्षण करण्यात आले असून भविष्यकालीन पाण्याची मागणी विचारात घेता सध्याच्या महापालिकेच्या सहाय्यक शोषण टाकीच्या लगतचा भूखंड वा इतर मोकळ्या भूखंडाची उपलबद्धता व इतर तांत्रिक बाबीची पडताळणी करून अतिरिक्त सहाय्यक शोषण टाकी व उदंचन केंद्र जलवाहिन्यांच्या जाळयांसह टाकण्याची कार्यवाही करण्याचे प्रावधान ठेवण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वरळी येथील बीडीडी चाळीच्या पुनर्विकासाबाबत

**(६) ७८९१ (१६-०७-२०२५). श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वरळी येथील बीडीडी चाळीच्या पुनर्विकासामध्ये विक्रीयोग्य निवासी व व्यावसायिक गाळे काढले जाणार आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुनर्विकासी इमारतीमध्ये किती निवासी व व्यावसायिक गाळे काढले जाणार आहेत,
(३) असल्यास, प्रकल्पातील किती इमारतींचे पुनर्विकासाचे काम पूर्ण झाले असून उक्त प्रकल्प किती कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजित केले आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बीडीडी चाळींचा पुनर्विकास लवकरात लवकर करण्याच्यादृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०४-२०२६) :** (१) होय हे खरे आहे.
(२) विक्रीयोग्य निवासी इमारत क्र. ८ व १० मध्ये अंदाजे ४४४२ सदनिका बांधण्यात येणार आहेत. तसेच इमारत क्र. ९ ही पूर्णत: विक्रीयोग्य व्यावसायिक इमारत बांधण्यात येणार असून सदर इमारतीचे चटई क्षेत्रफळ व इमारत क्र. ८ व १० मधील तळ व पहिल्या मजल्यावरील व्यावसायिक गाळयांचे चटई क्षेत्रफळ असे मिळून अंदाजे एकूण चटई क्षेत्रफळ १५३५०६.६० चौ.मी. एवढे आहे. सदर बांधकाम प्रस्तावित असून यात मंजूरी तथा

धोरणात्मक निर्णयाच्या आधीन बदल होऊ शकतो.
(३) विक्रीयोग्य एकूण ११ निवासी इमारतींपैकी ६ इमारतींना वैधानिक मंजूरी प्राप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे. वैधानिक मंजूरी प्राप्त झाल्यानंतर सदर इमारतींचे प्रत्यक्षात काम सुरु करण्यात येईल. प्रत्यक्ष काम सुरु झाल्यापासून त्यापुढील अंदाजे ५ वर्षात काम पूर्ण करण्यात येईल.
(४) पुनर्विकासात पुनर्वसन इमारतींच्या बांधकामाचे प्राधान्याने काम नियोजित आहे. उपलब्ध संक्रमण शिबीर विचारात घेऊन टप्प्या-टप्प्यात सदर काम करण्यात येणार आहे. त्यानुसार विक्रीयोग्य इमारतींचे बांधकाम सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नगरोत्थान योजनेअंतर्गत ३० टक्केऐवजी १० टक्के रक्कम भरणा करण्याबाबतच्या सुधारीत अटी टाकण्याबाबत

**(७) ७९३८ (०८-०९-२०२५). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नगरोत्थापन योजनेअंतर्गत राज्यात मागील वर्षी किती रक्कमेची तरतूद करण्यात आली त्यापैकी ‘‘ड’’ महानगर पालिकां करिता किती रक्कमेची तरतुद शासनाकडून करण्यात आली होती,
(२) असल्यास, शासन निर्णयानुसार ‘‘ड’’ वर्ग महानगरपालिकांना स्वामित्व धनाच्या ३० टक्के रक्कम भरण्याचे महानगर पालिकांवर बंधनकारक असल्याचे दिनांक २३ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ‘‘ड’’ वर्ग महानगर पालिकांची आर्थिक स्थिती चांगली नसल्याने ३० टक्के रक्कमेऐवजी १० टक्के इतकी रक्कम भरण्याबाबत सदर महानगरपालिकांमार्फत तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे मार्फत शासनाकडे केली मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने २० टक्केऐवजी १० टक्के इतकीच रक्कम भरण्याबाबत शासनाने सदर अट शिथिल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०३-२०२६) :** १) नगरोत्थान योजनेंतर्गत मागील आर्थिक वर्षात (सन २०२४-२५) महानगरपालिका खालील लेखाशीर्षात रुपये ६०० कोटी आणि नगरपरिषद/नगरपंचायत करिताच्या लेखाशीर्षात रुपये १८०० कोटींची तरतूद करण्यात आली होती.

सदर योजनेंतर्गत करण्यात येणारी वित्तीय तरतूद ही महानगरपालिका आणि नगरपरिषद / नगरपंचायत अशा दोन स्वरूपात करण्यात येत असून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या वर्गनिहाय करण्यात येत नाही.
(२), (३), (४) व (५) नगरोत्थान महाभियानाची सुधारित स्वरूपात अंमलबजावणी दिनांक २२ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात सुरू आहे.

सदर शासन निर्णयान्वये या अभियानांतर्गत ‘‘ड’’ वर्ग महानगरपालिकांच्या प्रकल्पांसाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा हिस्सा ३० % निश्चित करण्यात आलेला आहे.

सदर अभियानांतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या वर्गनिहाय वित्तीय आकृतीबंधाबाबतचा निर्णय हा मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेने घेतला असल्यामुळे यामध्ये बदल करता येणार नाही.

---

## मुंबईतील भूमिगत मेट्रोच्या सहा गाडया कारशेड मध्ये धूळ खात पडून असल्याबाबत

**(८) ८००१ (०८-०९-२०२५). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भूमिगत मेट्रोच्या सहा गाडया कारशेड मध्ये धूळ खात पडून असल्याचे माहे एप्रिल, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिवहन सेवेला प्रवाशांचा प्रतिसादही अत्यल्प आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन या परिवहन सेवेचा प्रवाशांचा प्रतिसाद मिळवून देणे व सदरील गाडया कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत मुंबई मेट्रो मार्ग-३ प्रकल्पासाठी एकूण २९ मेट्रो गाड्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. कडे प्राप्त झाल्या असून सर्व ट्रेन सचांच्या चाचण्या झालेल्या आहेत. दिनांक ०८.१०.२०२५ पासून मुंबई मेट्रो मार्गिका -३ (आरे ते कफ परेड) ही संपूर्ण मार्गिका प्रवासी वाहतूकीसाठी खुली करण्यात आली असून उपरोक्त २९ मेट्रो गाड्या वाहतूकीसाठी कार्यान्वित आहेत.

---

## मुंबईतील शौचालयाची झालेली दयनीय अवस्था

**(९) ८२०६ (०८-०९-२०२५). श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ६९ टक्के शौचालयात पाणी नाही तर ६० टक्के शौचालयात वीज नसल्याचे माहे जून, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान एका संस्थेच्या अहवालातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२६) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांचे सार्वजनिक आरोग्य सुधारण्यासाठी आणि मुंबईला उघडयावर शौचमुक्त करण्यासाठी वस्ती स्वच्छता कार्यक्रम (SSP) अंतर्गत मुंबईमध्ये झोपडपट्टी लोकसंख्येच्या आधारावर व लोकांच्या मागणीनुसार स्वच्छतागृहे बांधण्यात येतात. अशी मुंबईमध्ये लॉट-१ ते लॉट-११ मध्ये १६६५ सामुदायिक शौचालय (Community Toilet) बांधण्यात आली आहेत. व लॉट-१२ मध्ये ७० शौचालयांचे काम पुर्ण झाले असून ६० शौचालयांचे काम सुरू आहे.

सध्या कार्यान्वित असलेल्या सामुदायिक (Community Toilet) १४७६ शौचालयांपैकी १२२१ (८२%) शौचालायांना पाणी जोडणी आहे. तर १२९८ (८८%) शौचालयांना विद्युत जोडणी उपलब्ध आहे. ७३४ पैसे द्या आणि वापरा (Pay & Use) शौचालये आहेत. या सर्व शौचालयांना पाण्याची व विदयुत व्यवस्था उपलब्ध आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात म्हाडाने बांधलेल्या शौचालयांपैकी ३८३० शौचालये व इतर संस्थांनी बांधलेली ४७९ असे एकूण ४३०९ सार्वजनिक शौचालय महानगरपालिकेकडे विभागस्तरावर हस्तांतरण करुन घेण्यात आले व त्यांची दुरुस्ती करण्यात आली. या शौचालयांना देखभालीसाठी वस्ती पातळीवरील संस्था (CBO) बनविण्यासाठी अशासकीय संस्था (NGO) नियुक्त करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. या नंतर

सार्वजनिक शौचालयांच्या देखभालीसाठी वस्ती पातळीवरील संस्था (CBO) तयार करुन सार्वजनिक शौचालयांच्या देखभालीचे काम बृहन्मुंबई महानगरपालिके सोबत सामंजस्य करार करुन वस्ती पातळीवरील संस्था (CBO) यांना सोपविण्यात येत असून तेथे पाण्याची व विदयुत व्यवस्था तातडीने करण्यात येत आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) म्हाडाने बांधलेले इतर ४३०९ सार्वजनिक शौचालय देखभालीसाठी वस्ती पातळीवरील संस्था (CBO) बनविण्यासाठी अशासकीय संस्था नियुक्तीची प्रकिया सुरु आहे. प्रक्रिया पुर्ण होताच वस्ती पातळीवरील संस्थाची (CBO) नियुक्ती केल्या नंतर लाईट व पाण्याची व्यवस्था करण्यात येत आहे.

---

## महानगरपालिका “एन” विभाग, घाटकोपर येथे १०८ रुग्णवाहिकेस वाहन चालक नसल्याबाबत

**(१०) ८२१८ (१८-०९-२०२५). श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील महानगरपालिका “एन” विभाग, घाटकोपर येथे १०८ रुगणवाहिका उपलब्ध न झाल्याने दिड तास रक्तबंबाळ अवस्थेत पडलेल्या जखमीस अखेर रिक्षातुन राजावाडी रुग्णालयात नेल्याची घटना दिनांक २० मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेच्या भगवती रुग्णालयाच्या नुतणीकरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(११) ८२६४ (१८-०९-२०२५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बोरिवली येथील मुंबई महानगरपालिकेच्या भगवती रुग्णालयाच्या नुतनीकरणासाठी सन २०१० मध्ये प्रस्तावास मंजुरी देऊन ३२० कोटी रुपयाचा निधी मंजूर केला असतानाही अद्याप महानगरपालिकेने उक्त रुग्णालयाच्या नुतनीकरणाचे काम सुरु केले नसल्याचे नुकतेच निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु रुग्णालयाचे काम महानगरपालिकेने पीपीपी तत्वावर न करता स्वतः करावे यासाठी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ९ एप्रिल, २०२५ रोजी महानगरपालिका आयुक्तांना लेखी निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने महानगरपालिका आयुक्तांनी उक्त रुग्णालय नुतनीकरणाचे काम महानगरपालिकेतर्फे तातडीने सुरु करण्याच्या दृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन विलंबास जबाबदार असणाऱ्या संबधितांवर कोणती कारवाई

केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

दिनांक ०१ ऑगस्ट, २०१९ रोजी कार्यादेश काढून भगवती रुग्णालयाचे नुतनीकरणाचे काम महानगरपालिकेच्या आरोग्य पायाभूत सुविधा (कक्ष) यांच्या मार्फत सुरू करण्यात आले असून सदर काम अंतिम टप्प्यात आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सदरहू रुग्णालय महानगरपालिकेने स्वतः कार्यान्वित करण्यासाठी लागणारे आवश्यक मनुष्यबळ, यंत्रे व संयंत्रे, फर्निचर इत्यादीचा प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जोगेश्वरी पूर्व येथील श्रीमती निर्मलाताई रागिनवार मंडईचा पुर्नर्विकास करण्याबाबतचा प्रस्ताव**

**(१२) ८३२१ (२१-०७-२०२५). श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जोगेश्वरी पूर्व येथील श्रीमती निर्मलाताई रागिनवार मंडईचा पुर्नर्विकास करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावावर कधीपर्यत अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे,
(३) असल्यास, याकरिता किती निधीची तरतुद करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२६) :** (१) व (२) विद्यमान निर्मलाताई राजेश्वर रागिनवार मंडईच्या पुनर्विकासाचे काम बृहन्मुंबई महानगरपालिके मार्फत हाती घेण्यात आले आहे. या कामाकरीता वास्तू सल्लागार नेमण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर सुरू आहे.
(३) सदर काम सद्यस्थितीत प्रारंभीक टप्प्यात असल्याने सदर कामासाठी निधीची तरतुद केलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईत मलनि:स्सारण वाहिन्या आणि गटारांची सफाई करणाऱ्या सफाई कामगारांकरिता धोरण जाहीर करण्याबाबत**

**(१३) ८३७४ (२९-०६-२०२५). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत मलनि:सारण वाहिन्या आणि गटारांची सफाई करताना अनेक सफाई कामगारांना जीव गमवावा लागला असतानाही मुंबई महानगरपालिकेने आजमितिस या संदर्भात कोणतेही धोरण जाहीर केले नसल्याची बाब दिनांक १ मे, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय;
(२) असल्यास, मुंबईत साफसफाईची कामे करणाऱ्या सुमारे ५०० सफाई कामगारांचा दरवर्षी मृत्यू होत असून, त्यात पालिकेच्या कायमस्वरूपी कामगारांसह कंत्राटी कामगारांचाही समावेश असून सफाई कामगारांच्या जीविताचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,शासनाने गतवर्षी या संदर्भात मार्गदर्शक सूचना जारी केल्या असून सफाई कामगारांचे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण कमी करणेसाठी त्यांना योग्य त्या सोयी-सुविधांचा साधनाचा पुरवठा करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईत मलनि:स्सारण वाहिन्या आणि गटारांची सफाई करणाऱ्या सफाई कामगारांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत, नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही,

बृहन्मुंबई महानगरपालिकेत “हाताने मैला उचलणा-या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध करणे व त्यांचे पुनर्वसन करणे अधिनियम, २०१३” या कायद्याची अंमलबजावणी करण्यात आल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यातील मलनि:सारण वाहिन्यांची साफसफाई संपूर्णपणे यांत्रिकी पध्दतीने वाहन विराजीत संयंत्रांव्दारे करण्यात येते.

मलनि:सारण प्रचालन खात्यातील व कंत्राटदाराकडे कार्यरत असलेल्या एकाही कामगाराचा मलनि:सारण वाहिन्यांची साफसफाई करताना सन २०१३ पासून आजपर्यंत मृत्यू झालेला नाही.

दूषित गटारामध्ये काम करताना मृत्यू पावलेल्या / कायम अपंगत्व / अपंगत्व आलेल्या मॅन्युअल स्कॅव्हेंजर्सना / सफाई कामगारांना नुकसान भरपाई अदा करणेबाबत राज्याच्या धोरणाबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिनांक ३०.०४.२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.
(२) हे खरे नाही,
(३) बृहन्मुंबई महानगरपालिका घन कचरा व्यवस्थापन खात्यातील महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांस सुरक्षा साधने जसे हँडग्लोज, रिफ्लेक्टींग जॅकेट, गमबुट, फेस मास्क, गणवेश तसेच कामाकरिता लागणारे विविध आवश्यक साहित्य झाडू, फावडे, कचऱ्याचे डबे, लिफ्टर, जंतुनाशक पावडर व कर्मचारी सदनिका, आरोग्य गटविमा इत्यादी सेवा पुरविल्या जातात. सफाई कामांसाठी ज्या अशासकिय संस्था अथवा कंत्राटदाराद्वारे नियुक्त केले जातात. त्यांना सुरक्षासाधने खरेदी करण्यासाठी अतिरिक्त रक्कम दिली जाते. सुरक्षासाधने प्रत्येक कर्मचाऱ्याला बंधनकारक असल्याबाबत जनजागृतीही केली जाते.

मलनि:सारण खात्याच्या ताब्यातील मलनि:सारण वाहिन्यांची साफसफाई वाहन विराजीत संयंत्रांव्दारे संपूर्णपणे यांत्रिकी पध्दतीने व सर्व सुरक्षा साधनांचा वापर करुन करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई शहरातील अग्रिशमन केंद्रामधे मनुष्यबळ कमी असल्याबाबत**

**(१४) ८४६१ (०८-०९-२०२५). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरात दरवर्षी सरासरी आगीच्या ५००० घटना घडत असून त्या विझविण्यासाठी महापालिकेच्या अखत्यारित एकूण ५१ अग्निशमन केंद्रे असल्याचे दिनांक १२ फेब्रुवारी, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एकूण लोकसंख्या आणि लागणाऱ्या आगींच्या तुलनेत अग्निशमन दलाकडे मनुष्यबळ कमी

असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अग्निशमन केंद्रांची संख्या व कर्मचारी संख्या वाढविण्याबाबत व अग्रिशमन दलातील पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२६) :** (१) होय हे खरे आहे.

अंशतः म्हणजेच मुंबई अग्निशमन दलाच्या अभिलेखानूसार माहे जानेवारी, २०२४ ते दिनांक १५.०२.२०२५ पर्यंत ५९६९ आगीच्या दुर्घटना घडलेल्या आहेत. त्याचप्रमाणे, सद्यस्थितीत मुंबई अग्निशमन दलाची ३५ अग्निशमन केंद्रे, १९ लघु अग्निशमन केंद्रे आणि २२ विभाग कार्यालयवार अग्निशमन केंद्रे कार्यरत आहेत.
(२) होय हे खरे आहे.

सद्य:स्थितीत मुंबई अग्निशमन दलाच्या आस्थापनेवर एकूण ३८१२ अधिकारी व कर्मचारी वर्गाची पदे असून २७८३ एवढी पदे भरलेली आहेत. त्यापैकी कार्यशाळेतील तसेच प्रत्यक्ष कार्यवाहीवरील अधिकारी व कर्मचारी वर्गाची एकूण १०२९ पदे रिक्त असून त्यामध्ये अग्निशामक या संवंर्गातील ५४५ पदे रिक्त आहेत.
(३) बृहन्मुंबई महापालिकेच्या परिक्षेत्रामध्ये ठाकूर व्हिलेज, कांजुरमार्ग, चांदिवली, आंबिवली, सांताक्रुझ, माहुल आणि टिळकनगर येथे नविन अग्निशमन केंद्रे प्रस्तावित आहेत. अग्निशमन दलातील पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई उपनगरातील जे.व्ही.एल.आर. उड्डाणपूलाच्या लगत मोमीननगर इमारतीमधील रहिवाश्यांना त्रास होत असल्याबाबत

**(१५) ८६५८ (२१-०७-२०२५). श्री.हारुन खान (वर्सोवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील जे.व्ही.एल.आर. उड्डाणपूलाच्या लगत वर्सोवा विधानसभा क्षेत्रामध्ये मोमीननगर इमारतीमधील रहिवाश्यांना वाहनांचा कर्कश आवाज व रात्रीचा प्रखर प्रकाश यामुळे मोठया प्रमाणात त्रास होत असल्याने या ठिकाणी साऊड बॅरिकेट आणि व्हिजन बॅरियर बसविण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ जानेवारी, २०२५ रोजीच्या सुमारास मा.कार्यकारी अभियंता, पूल विभाग, हब, बृहन्मुंबई महानगरपालिका, वरळी, मुंबई यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषगांने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने ध्वनी प्रतिरोधक (Noise Barriers) आणि दृश्यविभाजक (View Cutter) बसविण्याकरिताचे अंदाजपत्र तयार करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील प्रभाग क्र. १९४ मधील काही इमारती व परिसरात कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(१६) ८६६७ (०८-०९-२०२५). श्री.महेश सावंत (माहिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील प्रभाग क्रमांक १९४ मधील दैनिक सामना मार्ग व सयानी रोड परिसरातील इमारतींमध्ये कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथील भागात राहणाऱ्या नागरिकांनी कमी दाबाने पाणीपुरवठा होत असलेल्याबाबत पालिकेकडे अनेकदा तक्रारी देखील केल्या आइेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने या समस्येचे निराकरण करण्यासाठी जलवाहिन्यांचे नूतनीकरण, दुरुस्ती तसेच जलदाब वाढविण्याच्या व्यवस्थेबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) प्रस्तुत भागात कमी दाबाने पाणीपुरवठा होत असलेल्या समस्येचे निराकरण करण्याकरिता सदर परिसरातील अस्तित्वात असलेल्या जुन्या व जीर्ण झालेल्या जलवाहिन्या बदलून नवीन जलवाहिन्या टाकण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई शहरात अनधिकृत नळजोडणी घेऊन सर्रास पाणी चोरी केली जात असल्याबाबत

**(१७) ८६७४ (१८-०९-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात अनधिकृत नळजोडणी घेऊन सर्रास पाणी चोरी केली जात असल्याचे माहे एप्रिल २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन पाणी चोरी करणाऱ्या विरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२६) :** (१) होय, हे अशंत: खरे आहे.

(२) माहे एप्रिल, २०२५ मध्ये मुंबई शहर व उपनगरात एकूण ४२६ अनधिकृत जलजोडण्या शोधून त्यापैकी २२ जलजोडण्या नियमित करण्यात आल्या व ४०४ जलजोडण्या खंडित करण्यात आल्या आहेत.

अनधिकृत जल जोडणी व पाणीचोरी बाबतच्या तक्रारी प्राप्त होताच तात्काळ पाहणी करून अनधिकृत जलजोडणी आढळल्यास महानगरपालिकेकडून ती त्वरीत खंडीत करण्याची कारवाई करण्यात येते.

(३) अनधिकृत जलजोडणी बाबत तक्रार प्राप्त झाल्यास महानगरपालिकेकडून जल आकार नियमावली नियम ४.१ (बी) नुसार म. न. पा. अधिनियम नूसार १८८८ कलम २७९ नुसार अशी जल जोडणी खंडित करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर जिल्हयातील वसई विरार महानगरपालिके क्षेत्रात पायाभूत सुविधांसाठी मुंबई महानगर शहर विकास प्राधिकरण, याचेमार्फत करण्यात येणाऱ्या कामाबाबत

**(१८) ८८६५ (१८-०९-२०२५). श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील वसई विरार परिक्षेत्रात पायाभूत सुविधांसाठी मुंबई महानगर शहर विकास प्राधिकरण, (एम.एम.आर.डी.ए.) यांचेमार्फत करण्यात आलेल्या रु.१७००/- कोटींची कामे निधी उपलब्ध नसल्यामुळे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, पायाभुत सुविधांची कामे मंजूर होवून निविदा प्रक्रिया पार पडून निधी अभावी कंत्राटदारांना कार्यारंभ आदेश देण्यात आलेले नाहीत असे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, वसई विरार महानगरपालिका क्षेत्रातील पायाभुत सुविधांची कामे प्राधान्यांने सुरू करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २६ मार्च,२०२५ मा.मुख्यमंत्री महोदयांना निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय.

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शहरातील वाढती लोकसंख्या व अपुऱ्या पायाभुत संविधांचा विचार करुन तातडीने निधी उपलब्ध करुन कामास सुरुवात करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) वसई विरार मनपा क्षेत्रातील ७ सी.सी. रस्त्याच्या कामांसाठी ८०% जमिनीची उपलब्धता आहे. तसेच वने, मीठागर जमीन, आणि पुनवर्सन व पुनवर्साहत बाबींच्या मंजुरी/परवानग्या प्राप्त करुन घेणे व महानगरपालिकेमार्फत सिमांकन व मध्यरेषा दर्शविण्याची कार्यवाही सुरु आहे.

वसई विरार मनपा क्षेत्रातील विराट नगर, ओसवाल नगरी, अलकापूरी, उमेळमान या चार ठिकाणी रेल्वे उड्डाणपुल उभारण्याचे प्रस्तावित आहे. यापैकी विराटनगर, व ओसवालनगरी याठिकाणची १०० टक्के जागा महानगरपालिकेच्या ताब्यात असून महानगरपालिकेमार्फत पीयर डिझाईन तपासणी करता आयआयटी पवई यांच्याकडे सादर केला आहे. आयआयटीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत प्राधिकरण स्तरावर कार्यवाही करण्यात येईल. तसेच अलकापूरी व उमेळमान या दोन रेल्वे उड्डाणपुलामुळे बाधित होणारी जागा ही खाजगी मालकीची असून सदर जागेचे भूसंपादन करणे व काही ठिकाणी मिठागर विभागाची व सरकारी जमिन असून या जमिनीच्या हस्तांतरणाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे महानगरपालिकेमार्फत सादर करण्यात आला आहे.

वसई विरार येथे ४० मी रुंदीचा रिंगरोड उभारणीचे सविस्तर सर्वेक्षणाचे काम महानगरपालिकेमार्फत सुरु करण्यात आलेले आहे. तसेच सदर रिंग रोड हा ४० मी ऐवजी ६० मी रुंद करण्याबाबत होत असलेल्या मागणीनुसार देखील तांत्रिक सुसाध्यता तपासणीची कार्यवाही महानगरपालिका व एमएमआरडीए यांच्यामार्फत सुरु आहे.

---

## भांडुप (पश्चिम) येथील ड्रीम्स मॉलमध्ये सुरू असलेल्या बेकायदेशीर पार्किंगबाबत

**(१९) ९२९५ (०८-०९-२०२५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगर जिल्हा तसेच शहरात पार्किंगची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असताना भांडुप (पश्चिम) येथील ड्रीम्स मॉलमध्ये बेकायदेशीर पार्किंग करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिला बचत गट आणि सामाजिक संस्थांना पे अँड पार्कच्या माध्यमातून अधिकृत पार्किंग सुविधा चालविण्याची जबाबदारी सोपविली जाणार आहे, हेही खरे आहे काय

(३) असल्यास, मुंबई महापालिका एस विभागाने सदर अनधिकृत पार्किंगबाबत अद्याप कोणतीही कारवाई केलेलीनाही, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनधिकृत पार्किंगबाबत उकोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२६) :** (१) ड्रीम्स मॉलमध्ये होणा-या बेकायदेशीर वाहनांच्या पार्कीगची बाब ही ड्रीम्स मॉल प्रशासक याच्यांशी संबधित आहे.

(२) रस्त्यावरील अधिकृत सशुल्क वाहनतळ योजनेच्या निविदा प्रक्रीयेमध्ये ५० टक्के महिला बचत गटाकरीता, २५ टक्के सुशिक्षित बेरोजगार संस्थांकरीता वाहनतळ राखीव ठेवण्यात आलेली आहेत व उर्वरीत २२ टक्के वाहनतळ सर्वसाधारण गटाकरीता ठेवण्यात आली होती. तसेच ३ टक्के वाहनतळ हे दिव्यांगांकरीता राखीव ठेवण्यात आली आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मानखुर्द शिवाजीनगर मधील नटवर पारेख कंपाउंडचा विकास करण्याबाबत

**(२०) ९३२७ (१८-०८-२०२५). श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानखुर्द शिवाजीनगर मधील नटवर पारेख कंपाउंडचा विकास एमएमआरडीए कडून करण्यात आला असून यातील काही भाग हा मनपास व काही भाग एमएमआरडीए ला हस्तांतरित करण्यात आला असून यामुळे या विभागातील विकास कामे होत नसल्याचे माहे एप्रिल, २०२५ वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी सदर विभाग हा ONE Time Policy करून मनपास हस्तांतरित करावे जेणेकरून विभागातील पाण्याची खराब जलवाहीणी दुरूस्त होईल व रिक्त जाग्यावर उद्याने बनविण्यात यावी तसेच नवीन सिवरेज लाईन टाकण्यात यावी व इतर नागरीकामे पूर्ण करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतीनिधी व नागरीकांमार्फत करण्यात येत असल्याचे हि निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विषयी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०३-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) नटवर पारेख कंपाऊंड या विकासकामार्फत बांधण्यात आलेल्या पुनर्वसन वसाहत मधील पोट

विभाजनानुसार न.भु.क्र.२/१० क्षेत्र १४१२चौ.मी. गार्डनसाठी, न.भू.क्र. २/१४ क्षेत्र १४२१चौ.मी. आरजीसाठी न.भू.क्र.२/६ क्षेत्र ९५३९चौ.मी. जमिन आर.जी साठी न.भू.क्र. २/८ क्षेत्र २८२१चौ.मी. जमिन पी.जी.साठी आरक्षित असून उपरोक्त ४ भूखंडावर मिळकत पत्रिकेवर बृहन्मुंबई महानगर पालिका यांचे नाव दाखल झाले आहे. त्याचप्रमाणे ॲमिनीटीज् प्लॉट न.भू.क्र.२/२ क्षेत्र २२५३चौ.मी. जमिन प्राधिकरणाच्या नावे भूखंड असून सदरचा शाळेच्या इमारतीचा ताबा दिनांक २५.११.२०२५ रोजी बृहन्मुंबई महानगर पालिकेस देण्यात आला आहे. मालमत्ता कर व जलदेयकाची प्रलंबित थकबाकी वसूल केल्यानंतर इमारत व अभिन्यासातील मूलभूत सुविधा देण्याबाबतची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल. तसेच, आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २९.१०.२०२४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार पुनर्वसन वसाहतीच्या विकास आराखड्यामधील आरजी, पीजी, गार्डन व ॲमिनीटीज प्लॉटसाठी आरक्षित असलेल्या भूखंडाचा ताबा लवकरात लवकर बृहन्मुंबई महानगर पालिकेला रीतसर हस्तांतरीत करण्याची कार्यवाही प्राधिकरण स्तरावर प्रगतीपथावर आहे.

---

## राज्यात ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांच्या वयाची अट ६५ वरून ६० करणेबाबत

**(२१) ९३८४ (१८-०८-२०२५). श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जेष्ठ नागरिकांच्या श्रावणबाळ योजनेचा लाभ घेण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांची वयाची अट वय वर्ष ६५ आहे, मात्र राज्य शासनाच्याच इतर योजनांसाठी वय वर्ष ६० ही वयाची अट आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र सरकारच्या विविध योजनांकरिता वय वर्ष ५८ तर महानगरपालिकेच्या योजनांसाठीची अट वय वर्ष ६० असून सर्वच ठिकाणी वयाच्या अटीमध्ये तफावत दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्रावणबाळ योजनेचे लाभधारक हे अत्यंत गरजू व निराधार असल्याने त्यांना अधिकाधिक लाभ मिळण्यासाठी वयाची अट शिथील करणेबाबत लोकप्रतिनिधींनी लेखी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत जास्तीत जास्त ज्येष्ठ नागरिकांना व निराधार नागरिकांना या योजनेचा लाभ होण्याच्या दृष्टीने श्रावण बाळ योजनेसाठी वयाची अट ६५ वरून ६० करणेकामी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ (०६-०३-२०२६) :** (१) व (२) श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेंतर्गत ६५ वर्ष व ६५ वर्षावरील निराधार नागरीक या योजनेचा लाभ घेण्यास पात्र ठरतात.

(३) व (४) यासंदर्भात विविध लोकप्रतिनिधी तसेच नागरीकांकडून वयाची अट शिथील करण्याची मागणी होत आहे.

संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना या योजनेतील लाभार्थ्यांना अर्थसहाय्याचे वितरण डी.बी.टी. द्वारे करण्याचा शासनाने निर्णय घेतला असून, माहे डिसेंबर, २०२४ पासून सदरहू योजनेतील लाभार्थ्यांना अर्थसहाय्याचे वितरण त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात त्याच महिन्यात नियमितपणे जमा करण्यात येत आहे.

संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना या योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात रु.१५००/- वरुन रु.२५००/- इतकी वाढ दिनांक १५/०९/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे.

श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील डी.बी.टी पोर्टलवर नोंदणी झालेल्या आधार प्रमाणिकृत लाभार्थ्यांना दरमहा डी.बी.टी पोर्टलद्वारे अर्थसहाय्य थेट त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येत आहे. माहे जानेवारी, २०२६ अखेरे ३०,४६,८३३ इतक्या लाभार्थ्यांना डी.बी.टी पोर्टलद्वारे अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले आहे.

श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील लाभार्थ्यांच्या वयाची अट कमी करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वसई - विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील गावांना जोडणारा ४० मीटर रुंदीचा रिंगरोडच्या बांधकामासाठी मंजूरी मिळण्याबाबत**

**(२२) ९५३१ (१८-०८-२०२५). श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत विस्तारीत मुंबई नागरी पायाभुत सुविधा प्रकल्प (Extd. MUIP) अंतर्गत वसई - विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील चार प्रमुख शहरे व सभोवतालच्या गावांना जोडणारा ४० मीटर रुंदीचा रिंगरोडच्या बांधकामाबाबत दिनांक ३१ ऑगस्ट, २०२३ या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील प्रस्तावात कामांची किंमत नमूद नसल्याकारणाने तसेच प्राधिकारणाच्या धोरणानुसार व याबाबत तत्कालीन मा. मुख्यमंत्री यांचेकडे झालेल्या बैठकीत दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने वरील नमूद पत्रान्वये मा. आयुक्त तथा प्रशासक वसई-विरार शहर महानगरपालिका यांना सदर कामांसाठी लागणारी अंदाजित ढोबळ किंमत, रस्त्यांची लांबी रूंदी दर्शविणारे नकाशे, महासभेचा ठराव, विकास आराखडे, सदर काम केंद्र किंवा राज्य शासनाच्या योजनेअंतर्गत न झाल्याबाबतचा दाखला तसेच बांधकामास लागणा-या जागेपैकी किमान ८०% जागा उपलब्धते बाबतचे ताबा पावती, ईसहीत प्रस्ताव प्राधिकरणास सादर करण्याच्या सूचना प्राधिकरणाने दिल्या असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील नमूद प्रमाणे महानगरपालिके कडून सदर बाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे काय, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात वाढत्या नागरीकरणाचा विचार करता सदरहू ४० मीटर रुंदीचा रिंगरोडच्या बांधकामासाठी शासन तातडीने मंजुरी देऊन निधीची उपलब्धता करण्यासाठी काही ठोस उपाययोजना करणार आहे काय

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निषपन्न झाले,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) होय, हे खरे आहे.

वसई विरार महानगरपालिकेकडून ४० मीटर रुंदीचा रिंगरोडच्या बांधकामाबाबतचा प्रस्ताव प्राधिकरणास प्राप्त झाला होता. तथापि, पालघर जिल्ह्याचे पालमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८.१०.२०२५ रोजी वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित असलेल्या प्रकल्पांसंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर चर्चे वेळी वसई विरार महानगरपालिका क्षेत्रातील वाढते नागरीकरण विचारात घेऊन रिंग रोड हा ४० मीटर ६० मीटर रुंदीचा तयार करण्याबाबत व त्यासंबंधीची तांत्रिक सुसाध्यता तपासणी करुन सविस्तर प्रकल्प

अहवाल प्राधिकरणास सादर करण्याबाबत निर्देशित केले आहे.

त्यानुसार वसई विरार महानगरपालिकेकडून सविस्तर प्रकल्प अहवाल तसेच भूसंपादन, हमीपत्र व इतर त्यानुषंगीक असणाऱ्या परवानग्या प्राप्त करुन दिल्यानंतर प्राधिकरणामार्फत सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेऊन रिंग रोड विकसित करण्याबाबतच आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

---

## वसई विरार शहर महानगरपालिका(जि.पालघर) क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी एमएमआरडीएकडून मंजूर कामे निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत

**(२३) ९६८७ (०८-०९-२०२५). श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई – विरार (जि.पालघर) शहर उपप्रदेशाचा सन १९८८ मध्ये एम.एम.आर.डी.ए. च्या कार्यक्षेत्रात समावेश करण्यात आला असून अंदाजे ३० लाख लोकसंख्या असलेल्या वसई – विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात सन १९८८ पासून ते आजपर्यंत ३७ वर्षात एम.एम.आर.डी.ए. मार्फत अंदाजे एकूण १०० कोटी पेक्षाही कमी निधी विकासकामांकरिता खर्च करण्यात आल्याचे माहे मे, २०२५ च्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एम.एम.आर.डी.ए. मार्फत वसई विरार शहराकरिता अंदाजे ७ हजार कोटींची विकासकामे मंजूर असून निधी अभावी ही विकासकामे प्रलंबित असल्याने शहराचा विकास होऊ न शकल्याने नागरिक मुलभूत सुविधांपासून वंचित राहिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वसई – विरार शहराचा विकास करण्यासाठी प्रलंबित असलेला विकास निधी मंजुर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१) एमएमआरडीएमार्फत सन १९८८ पासून ते आजपर्यंत नायगाव-जुचंद्र बोपाने ते नायगाव रेल्वे स्टेशन पर्यंत सुधारणा व नायगाव रेल्वे स्टेशन येथे उड्डाणपूल व खाडीवरील पूल (रु.११० कोटी), नालासोपारा-निर्मल MDR- ३९ (१२.५० किमी.) रस्ता आणि पुलासहित रस्त्याचे रुंदीकरण (रु.४९.२८ कोटी), वसई - सातिवली कमान रोड MDR ४० रेंज ऑफिस ते चिंचोटी फाटा रस्त्याची सुधारणा (रु.४१.६८ कोटी) त्याचप्रमाणे पालघर जिल्हयात एकूण रु.१६५.७ कोटी मंजूर कामांपैकी ४०.८५ कोटींची कामे पूर्ण करण्यासाठी देण्यात आला आहे. अशी एकूण रु.२४१.८१ कोटी इतका निधी देण्यात आला असून उर्वरीत कामे प्रगतिपथावर आहेत.

(२) एम.एम.आर.डी.ए. मार्फत वसई विरार शहराकरिता ७ उड्डाणपुलांची बांधकामे रु. १८२४.८०, ७ रस्त्यांचे बांधकामे रु. २५९६.६९, पुर्व-पश्चिमेस जोडणारी ४ रेल ओवरब्रिजची बांधकामे रु. १०९९.६७, ४ प्रमुख शहरे व सभोवतालच्या गावांना जोडणारा ४० मीटर रुंदीचा रिंगरोड बांधणे. रु.१०६२४.१९ अशी एकूण रु. १६१४५.३५ कोटींची कामे प्रस्तावित आहे.

(३) व (४) वसई विरार मनपा क्षेत्रातील ७ सी.सी. रस्त्याच्या कामांसाठी ८०% जमिनीची उपलब्धता आहे. तसेच वने, मीठागर जमीन, आणि पुनवर्सन व पुनवर्साहत बाबींच्या मंजुरी/परवानग्या प्राप्त करुन घेणे व महानगरपालिकेमार्फत सिमांकन व मध्यरेषा दर्शविण्याची कार्यवाही सुरु आहे.

वसई विरार मनपा क्षेत्रातील विराट नगर, ओसवाल नगरी, अलकापूरी, उमेळमान या चार ठिकाणी रेल्वे उड्डाणपुल उभारण्याचे प्रस्तावित आहे. यापैकी विराटनगर, व ओसवालनगरी याठिकाणची १०० टक्के जागा

महानगरपालिकेच्या ताब्यात असून महानगरपालिकेमार्फत पीयर डिझाईन तपासणी करता आयआयटी पवई यांच्याकडे सादर केला आहे. आयआयटीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत प्राधिकरण स्तरावर कार्यवाही करण्यात येईल. तसेच अलकापूरी व उमेळमान या दोन रेल्वे उड्डाणपुलामुळे बाधित होणारी जागा ही खाजगी मालकीची असून सदर जागेचे भूसंपादन करणे व काही ठिकाणी मिठागर विभागाची व सरकारी जमिन असून या जमिनीच्या हस्तांतरणाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे महानगरपालिकेमार्फत सादर करण्यात आला आहे.

वसई विरार येथे ४० मी रुंदीचा रिंगरोड उभारणीचे सविस्तर सर्वेक्षणाचे काम महानगरपालिकेमार्फत सुरु करण्यात आलेले आहे. तसेच सदर रिंग रोड हा ४० मी ऐवजी ६० मी रुंद करण्याबाबत होत असलेल्या मागणीनुसार देखील तांत्रिक सुसाध्यता तपासणीची कार्यवाही महानगरपालिका व एमएमआरडीए यांच्यामार्फत सुरु आहे.

---

## ठाणे जिल्ह्यातील प्राधिकरणाच्या ( एसपीए ) क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे नियमित करणेबाबत

**(२४) १०५६३ (१८-०८-२०२५). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील प्राधिकरणाच्या अखत्यारितील विशेष नियोजन प्राधिकरण (एसपीए) क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे नियमित करणेबाबत मा.सर्वोच्च न्यायालय येथे दाखल असलेल्या सिव्हील अपील क्र.१४६०४/२०२४ आणि अपील क्र. १४६०५/२०२४ च्या अनुषंगाने न्यायालयाने दिनांक १७ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास अनधिकृत बांधकामे यांच्या नियमित करणे बाबत निर्देश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार प्राधिकरणाच्या विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे नियमितकरणाच्या धोरणाची मुदत संपल्याकारणाने जे नियमितीकरणाचे प्रस्ताव प्राधिकरणास विहित मुदतीत सादर झालेले आहेत अशा प्रस्तावाच्या नियमिती करण्याबाबत शासन स्तरावर काय निर्णय घेण्यात आला आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल रिट याचिका (सिव्हील) क्र. २९५/२०२२ व इतर दोन तसेच, सिव्हील अपील क्र.१४६०४/२०२४ व अपील क्र. १४६०५/२०२५ श्री. राजेंद्र कुमार बडजात्या व इतर विरुध्द युपी आवास एवं विकास परिषद तसेच, राजीव गुप्ता व इतर विरुध्द युपी आवास एवं विकास परिषद या याचिकांमध्ये मा. न्यायालयाने अनधिकृत बांधकामांच्या अनुषंगाने अनुक्रमे दिनांक १३.११.२०२४ व दिनांक १७.१२.२०२४ रोजी आदेश पारीत केले होते. मा. सर्वोच्च न्यायालयाने सदर आदेश पारीत करतांना अनधिकृत बांधकाम निष्कासीत/नियमित करण्याच्या अनुषंगाने परिच्छेद क्र. ९० ते ९४ मध्ये निरीक्षणे नोंदविली असून जिल्हादंडाधिकारी यांच्या मार्फत सर्व संबंधीत नियोजन प्राधिकरणांच्या निर्दशनास आणून देण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने शासनाने दिनांक २५.०२.२०२५ व २५.०४.२०२५ रोजीच्या परिपत्रकान्वये अनाधिकृत बांधकामांबाबत कार्यपद्धती प्रसिद्ध केली आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाचे सदर निर्देश ठाणे जिल्ह्यातील प्राधिकरणाच्या अखत्यारितील भिवंडी परिसर अधिसुचित क्षेत्र (BSNA), अंबरनाथ, कुळगाव-बदलापूर आणि परिसर अधिसुचित क्षेत्र (AKBSNA) व कल्याण ग्रोथ सेंटर (KGC) या अधिसुचित क्षेत्रास देखील लागू आहेत.

(२), (३) व (४) ठाणे जिल्ह्यातील प्राधिकरणाच्या अधिसूचित क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे नियमीत करणेकरीता दिनांक ३१.१२.२०२२ पर्यंत प्रस्ताव सादर करणेबाबत दिनांक ११.०३.२०२२ रोजी परिपत्रक प्रसिध्द करण्यात आले होते. तद्नंतर सदर प्रस्ताव स्वीकारण्याची मुदत दिनांक ३१.०३.२०२४ पर्यंत वाढविण्यात आली होती. या वाढीव मुदतीत प्राधिकरणाकडे नियमितीकरणासाठी एकूण ३३१ प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यापैकी ३३ प्रकरणांमध्ये अटी व शर्तीसह नियमितीकरणाची परवानगी प्रदान करण्यात आली आहे व २७२ प्रकरणे नाकारण्यात आली आहेत. सद्यःस्थितीत नियमितीकरण प्रस्ताव नाकारलेल्या व प्राधिकरणास विहीत मुदतीत सादर झालेल्या उर्वरीत २६ प्रस्तावांवर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार व शासनाच्या दिनांक २५.०२.२०२५ व दिनांक २५.०४.२०२५ रोजीच्या परिपत्रकांनुसार कार्यवाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्तरावर करण्यात येत आहे.

---

## मुंबईतील सायन रेल्वेस्थानक येथील ब्रिटीशकालीन पुलाची झालेली दूरवस्था

**(२५) १०८९९ (१९-०९-२०२५). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सायन रेल्वेस्थानक येथील पुर्वेकडून पश्मिमेकडे जाण्यासाठी असलेला ब्रिटीशकालीन ब्रिजची दुरवस्था झाल्यामुळे नवीन बांधण्यासाठी जुना ब्रिज पाडून नविन ब्रिजचे काम गेल्या पाच ते सहा महिन्यापासून सुरु करण्यात आलेले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू काम महानगरपालिका व रेल्वे प्रशासनाकडून अत्यंत धिम्म्यागतीने सुरु असल्याने वाहतूकी कोंडी वाढलेली असून शाळकरी विदयार्थी नागरिकांना ये-जा करण्यास गैरसोयीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदर कामासंदर्भात दिनांक २५ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास जनआंदोलन करण्यात येऊनही अदयाप काम धिम्या गतीने सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत उक्त काम जलद गतीने करणेबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे,

आय आय टी मार्फत करण्यात आलेल्या संरचनात्मक तपासणी अहवाल माहे नोव्हेंबर २०२३ नुसार शीव (Sion) स्थानकाजवळील पुलाची अधिसंरचना (Superstructure) धोकादायक असल्याचे आढळले आहे. यास्तव पुलाच्या पुर्नबांधणीचे काम मध्य रेल्वे मार्फत दिनांक०१ ऑगस्ट, २०२४ व सदर पुलाच्या पोहोचरस्त्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक२४ डिसेंबर, २०२४ रोजी सुरू करण्यात आलेले आहे.

(२) व (३) सदर पूलावरून शाळकरी मुलांना तसेच नागरिकांना पायी चालून पूर्व पश्चिम जाण्याकरीता सदर पुलाचे काम दोन टप्यात करण्याचे नियोजित आहे.

पहिल्या टप्प्यामध्ये पूलाचा उत्तरेकडील अर्धा भाग निष्कासित करून दक्षिणेकडील अर्धा भाग न तोडता पादचा-यांसाठी व शाळकरी मुलांना पूर्व-पश्चिम ओलांडण्यासाठी रेल्वेचा अर्धा भाग ठेवण्यात आला आहे. सदर भाग दुसरा टप्याकरिता तोडण्यासाठी मध्य रेल्वे मार्फत नवीन पादचारी पुलाचे बांधकाम सुरू असून ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे. तो पूर्ण झाल्यानंतर दुस-या टप्यातील पूलाचा भाग (दक्षिण भाग) निष्कासित करण्यात येणार आहे. त्यामुळे पादचा-यांसाठी व शाळकरी मुलांना पूर्व-पश्चिम जाण्या-येण्यास गैरसोय होणार नाही याची काळजी घेण्यात आली आहे.

(४) सदर बाबतीत मुख्य सचिव महाराष्ट्र शासन यांच्या मार्फत महाव्यवस्थापक मध्य रेल्वे यांना सदर पुलाचे काम वेळेत पूर्ण करण्याकरिता अर्ध शासकिय पत्र पाठविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महानगरपालिका शाळांतील प्रेक्षागृहे व वर्ग ( खोल्या) राज्य निवडणूक आयोगाच्या ताब्यात घेतल्या असल्यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी व समस्यांबाबत**

**(२६) १०९८८ (०८-०९-२०२५). श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील १५ प्रेक्षागृहे आणि ७८ वर्ग महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाच्या ताब्यात असून काही प्रेक्षागृहे गोदामांमध्ये रूपांतरित करण्यात आली आहेत, तर काही गेल्या १० वर्षांहून अधिक काळापासून बंद अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धारावी टी.सी. मराठी शाळा, न्यू सायन शाळा, वर्ली सी फेस शाळा व सिटी ऑफ लॉस एंजेलिस, माटुंगा या शाळांमध्ये प्रेक्षागृहे व वर्ग अद्याप निवडणूक आयोगाच्या ताब्यात असल्याने वर्गांची विलिनीकरण करून तात्पुरते वर्ग चालवावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा प्रकारच्या अडथळयांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर विपरीत परिणाम होत असल्याने निवडणूक आयोगाच्या ताब्यात असलेल्या शाळा जागा परत मिळवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच भविष्यात अशा अडचणी निर्माण होऊ नयेत यासाठी कोणती धोरणात्मक उपाययोजना राबवण्यात येणार आहे,

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत महानगरपालिका शाळांतील १६ सभागृहे व ६२ वर्गखोल्या निवडणूक आयोगाच्या ताब्यात आहेत. काही प्रेक्षागृहे गोदामांमध्ये रुपांतरित करण्यात आली आहेत.

निवडणूक कालावधी वगळता काही प्रेक्षागृहे व वर्गखोल्या गेल्या १० वर्षाहून अधिक काळापासून बंद अवस्थेत आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

धारावी टी.सी. मराठी शाळेतील वर्गाचे विलिनीकरण करून तात्पुरते वर्ग चालवावे लागत आहे. न्यु सायन शाळेतील वर्गाचे विलिनीकरण करण्यात आलेले नाही. वरळी सी फेस मनपा शाळेतील वर्गाचे विलिनीकरण करण्यात आलेले नाही. सिटी ऑफ लॉस एंजेलिस, माटुंगा शाळेतील वर्गाचे विलिनीकरण करण्यात आलेले नाही.
(३) वर्गखोल्या परत मिळविण्यासाठी प्रशासकीय अधिकारी (शाळा) यांच्या मार्फत निवडणूक निर्णय अधिकारी यांना सातत्याने पत्रव्यवहार करण्यात येत आहे.

---

## मागाठाणे गोरेगाव १२० फुट विकास नियोजन रस्ता या प्रकल्पाला विलंब होत असल्याबाबत

**(२७) ११०६३ (०८-०९-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागाठाणे – गोरेगाव १२० फुट विकास नियोजन रस्ता हा विशेष प्रकल्प घोषित केला तथापि या प्रकल्पाला विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पास विलंब लागण्याची नेमकी काय कारणे आहेत, कधीपर्यंत हा प्रकल्प पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुसार प्रकल्प पूर्ण करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

मागाठाणे - गोरेगाव १२० फुट विकास नियोजन रस्ता हा ३६.६० मी. रुंदीचा विकास नियोजित रस्ता असून सदर रस्ता पश्चिम द्रुतगती मार्गास समांतर रस्ता आहे. सदर रस्ता मागाठाणे, आर मध्य विभाग ते गोरेगाव, पी/उत्तर विभाग रत्नागिरी हॉटेल पर्यंत ५.२ किमी लांबीचा रस्ता आहे. सदर रस्त्यांपैकी २.६० किमी रस्ता विकसित झालेला आहे. उर्वरित रस्त्यापैकी एकूण तीन ठिकाणी सदर रस्ता अद्याप विकसित होवू शकलेला नाही.

(२) आर/मध्य विभागात मोडणाऱ्या मागाठाणे येथील माता बालक रुग्णालय, सिद्धार्थ नगर पासून मागठाणे पर्यंतची जोडणी (०.८ किमी) बाधित जमिनींच्या भूसंपादन न झाल्याने प्रलंबित होते. सद्यस्थितीत सदर प्रक्रिया महानगरपालिकेमार्फत चालू आहे.

आर/दक्षिण विभागातील सिंग इस्टेट येथील रस्ता जोडणी (०.३५ किमी) बांधकामांनी बाधित असून त्यांच्या स्थलांतराची कार्यवाही महानगरपालिके मार्फत सुरु आहे. सदर बाबत सहाय्यक आयुक्त, आर/दक्षिण विभागाचे अभिप्राय घेणे उचित ठरेल. रस्ते विभागामार्फत डब्लू-४२६ अंतर्गत सदर रस्त्याच्या जोडणीसाठी कंत्राटदार नियुक्त करण्यात आला असून बाधित बांधकामांचे निष्कासन झाल्यावर रस्त्याचे काम सुरु करणे शक्य आहे.

पी/उत्तर विभागातील अप्पापाडा येथील रस्ता जोडणी १.६ किमी पैकी ०.७ किमी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातून जातो व वन विभागामार्फत आवश्यक परवानग्या मिळविण्याचे कार्य प्रगतीपथावर आहे. सदर परवानग्या मिळविण्याचे कार्य अंतिम टप्प्यात आहे. रस्ते विभागामार्फत डब्लू-४०१ अंतर्गत सदर रस्त्याच्या जोडणीसाठी कंत्राटदार नियुक्त करण्यात आला असून सदर झोपडूयांचे निष्कासन त्यांचेमार्फत झाल्यावर रस्त्याचे काम सुरु करण्यात येत आहे.

(३) वरील अनु.क्र.२ मधील उल्लेखित प्रलंबित बाबींची पूर्तता लवकरात लवकर होणेसाठी व तसेच सदर प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने अंमलबजावणीसाठी सदर प्रकल्प हा महाराष्ट्र शासनाकडून मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, वॉर रूम मध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेच्या के पूर्व विभागातील विलेपार्ले येथील नाले सफाई केली नसल्याबाबत

**(२८) ११२५० (१९-०९-२०२५). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत मान्सून पूर्व पाऊस सुरु झाला असतानाही महानगरपालिकेच्या के पूर्व विभागातील विलेपार्ले परिसरातील नाले व गटारे सफाई झाली नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाचे पाणी वाहून नेणाऱ्या रस्त्यालगतच्या पर्जन्य जलवाहिन्यांतून ठिकठिकाणी काढण्यात आलेला गाळही दुर्लक्षित राहिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेकडून मान्सून पूर्व कामे प्रलंबित असल्याने विलेपार्ले परिसरातील कदम चाळ, पाटीलवाडी, इस्माईल चाळ आदी वस्त्यांमध्ये जागोजागी गटारांमधील पाणी तुंबल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन नाले सफाई योग्य रीतीने करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

विलेपार्ले (पूर्व) विधानसभा परिसरातील नाले व गटारे सफाई करण्याचे काम दिनांक ०२.०४.२०२५ रोजी सुरू करण्यात आले असुन माहे मे, २०२५ पर्यंत मान्सून पूर्व नालेसफाई ८० टक्के करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) कदमचाळ, विलेपार्ले (पूर्व) येथील ब्लॉसम इमारतीच्या लगतच्या कल्पवृक्ष सोसायटीपासून संत मुक्ताबाई रस्त्यापर्यंत तसेच पाटीलवाडी, इस्माईल चाळ येथील नाले सफाईचे काम दिनांक ०४.०६.२०२५ रोजी पूर्ण झाले आहे. महानगरपालिकेव्दारे सदर ठिकाणी साचलेल्या पाण्याचा निचरा करण्यासाठी के/पूर्व विभागामार्फत पंप संपूर्ण पावसाळा कालावधीकरिता कार्यान्वित करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील सांडपाण्यावर प्रकिया करणारे प्रकल्प लवकर कार्यान्वयित होण्याबाबत

**(२९) ११३९४ (०८-०९-२०२५). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील समुद्रात सोडल्या जाणाऱ्या सांडपाण्यावरील प्रकीयेसाठी ७ एसटीपी प्रकल्पांची उभारणी मुंबई महागर पालिका करणार असल्याचे माहे एप्रिल, २०२५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खर आहे काय,

(२) असल्यास, हे सात प्रकल्प कुठे कुठे उभारणार आहे व त्याची सद्यस्थिती काय आहे,

(३) तसेच,या प्रकल्प पूर्ण होण्यासाठी किती कालावधी लागणार आहे, व प्रकल्प प्रलंबित असल्याची कारणे काय आहेत

(४) नसल्यास, शासनाने चौकशी करुन उक्त प्रलंबित प्रकल्प पूर्ण कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुंबई मलनिःसारण प्रकल्पांअतर्गत ७ मलजल प्रक्रिया केंद्राची कामे प्रगतीपथावर आहेत. या अंतर्गत वरळी, वांद्रे, धारावी, वर्सोवा, मालाड, भांडूप व घाटकोपर या ७ ठिकाणी मलजल प्रक्रिया केंद्रे उभारण्यात येत आहेत. या सातही मलजल प्रक्रिया केंद्राची एकत्रित प्रक्रिया क्षमता ही दररोज २४६४ दशलक्ष लीटर आहे.

या ७ मलजल प्रक्रिया केंद्रांमुळे मुंबईच्या सभोवताली असणाऱ्या समुद्राचे पाणी स्वच्छ होण्यास मदत होणार आहे. समुद्री पाण्याची गुणवत्ता अधिक चांगली झाल्यामुळे त्याचा अनुकूल परिणाम सागरी जीवनावर आणि सागरी वनस्पतीवर होऊन पर्यावरण पूरकता देखील साधली जाणार आहे.

(३) भांडूप, घाटकोपर व वर्सोवा या प्रकल्पांचा बांधकाम कालावधी ४ वर्षे असून घाटकोपर व वर्सोवा प्रकल्पांचा कार्यान्वित करण्याचा नियोजित दिनांक ०४.०७.२०२६ आहे व भांडूप प्रकल्पाचा कार्यान्वितीकरणांचा नियोजित दिनांक २२.०८.२०२६ आहे. वरळी, वांद्रे, धारावी या प्रकल्पांचा बांधकाम कालावधी ५ वर्षे असून या तीन प्रकल्पांचा कार्यान्वितीकरणाचा नियोजित दिनांक ०४.०७.२०२७ आहे. तसेच मालाड प्रकल्पाचा बांधकाम कालावधी ६ वर्ष असून या प्रकल्पाचा कार्यान्वितीकरणाचा दिनांक ०४.०७.२०२८ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### स्मार्ट सिटी मिशन योजने अंतर्गत ठाणे महानगरपालिकेतील विकास कामाबाबत

**(३०) ११८०५ (१८-०९-२०२५). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहराला स्मार्ट सिटी योजने अंतर्गत ठाणे शहरात विविध विकास कामांमध्ये अनेक तक्रारी आल्याचे निदर्शनास आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यात एम.एम.आर.डी.ए, इन्फ्रास्ट्रक्चर, मेट्रो, सॅटिस या कामांना विलंब होत असल्यामुळे वाहतूकीची प्रचंड कोंडी निर्माण होत असून दरवर्षी नालेसफाईच्या कामात व रस्त्यावरील खड्डे दुरुस्तीच्या कामात भ्रष्ट्राचार होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे शहरात स्मार्ट सिटी योजने अंतर्गत झालेल्या कामांची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित जबाबदार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत ठाणे स्मार्ट सिटी लि मार्फत एकुण ३९ प्रकल्पांची कामे हाती घेण्यात आली होती पैकी एकूण ३६ प्रकल्प पुर्ण झालेली असून ३ महत्वाकांक्षी प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) हे अंशत खरे आहे.

एम.एम.आर.डी.ए., मेट्रो यांच्यावतीने सुरू असलेल्या कामांमुळे वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी ठाणे महानगरपालिका संबंधित यंत्रणांशी समन्वय साधून वाहतुक कोंडी होणार नाही याची दक्षता घेते.

नालेसफाईची कामे दरवर्षी ठाणे महानगरपालिकेच्या वतीने निविदा काढून पारदर्शी पध्दतीने केली जातात. नालेसफाईच्या कामावर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभाग व घनकचरा विभागामार्फत देखरेख करण्यात येऊन नालेसफाईच्या झालेल्या कामाच्या नोंदी ठेवण्यात येतात. नालेसफाईचे काम सुरु

करण्यापूर्वीचे, नालेसफाईचे कामे चालू असतानाचे तसेच नालेसफाईचे काम पूर्ण झाल्यानंतरचे व्हिडीयो रेकॉडिंग तसेच GPS Location सह छायाचित्रे सादर करणे कंत्राटदारास बंधनकारक आहे.

नालेसफाई पूर्ण झाल्यानंतरही पावसाळा कालावधी संपेपर्यंत आवश्यकतेनुसार नालेसफाईची कामे मंजूर निविदाकाराकडून अधिकचा मोबदला न देता करुन घेतली जातात. त्यानुसार निविदाकारास पावसाळा कालावधीमध्ये ७५% देयक अदा करुन २५% रक्कम राखून ठेवण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

ठाणे महानगरपालिकेने शहरामधील रस्त्यांचा विकास करणेकरीता एकात्मिक रस्ते विकास कार्यक्रम हाती घेतला असून, याकरीता नगर विकास विभागामार्फत टप्पा १ व २ मध्ये २८३ रस्त्यांचा समावेश असून, त्यापैकी एकूण १३५ कि.मी. लांबीच्या २७५ रस्त्यांची कामे पूर्ण झाली असल्यामुळे ठाणे महानगरपालिका हद्दीत मुख्य रस्ते खड्डे मुक्त झालेले आहेत.

तसेच ठाणे महानगरपालिका हद्दीमधील पावसाळा दरम्यान पडणाऱ्या खड्ड्यांची दुरुस्ती करणेबाबत प्रभाग समिती निहाय व मुख्यालयामार्फत निविदा काढण्यात आल्या असून सदर खड्डे बुजविण्याची कार्यवाही तात्काळ करण्याचे नियोजन ठाणे महानगरपालिके मार्फत करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूरातील नाग नदी प्रदुषण निर्मुलन प्रकल्पाबाबत

**(३१) ११८१५ (१९-०९-२०२५). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर (जि.नागपूर ) येथील नाग नदी प्रदुषण निर्मुलन प्रकल्पाअंतर्गत ९३ दक्षलक्ष लिटर क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया केंद्र रू.१९२७ कोटी रुपयांच्या निधीसह उभारण्यात येणार हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाला पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकार व महानगरपालिका हे किती निधी देणार असून किती कालावधीत हा प्रकल्प पूर्ण करणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

या प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता प्राप्त किंमत एकूण रु.१९२६.९९ कोटी आहे. या प्रकल्पांतर्गत ३ ठिकाणी एकूण ९२ दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमता असलेले नविन मलशुध्दीकरण केंद्र उभारण्यात येत आहे.

(२) हे खरे आहे.

प्रकल्पाकरीता केंद्रशासनाकडून रु.१११५.२२ कोटी, राज्यशासन रु.५०७.३६ कोटी व नागपूर महानगरपालिका रु.३०४.४१ कोटी अशा प्रकारे वित्तीय आकृतीबंध निश्चित करण्यात आला असून प्रकल्प पूर्ण करण्याकरिता ८ वर्षांचा कालावधी लागणार आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई मेट्रो लाईन ३ मध्ये पावसाचे पाणी भरल्याबाबत**

**(३२) ११८८४ (१९-०९-२०२५). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स ते वरळी दरम्यान मुंबई मेट्रो लाइन ३ चे उद्धाटन दिनांक १० मे, २०२५ रोजी त्यासुमारास करण्यात आल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २६ मे, २०२५ रोजी वा त्या सुमारास सदर मेट्रो लाइनमध्ये पावसाचे पाणी शिरून मेट्रो सेवा बंद करण्यात आल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मेट्रो लाइनमध्ये पावसाचे पाणी शिरण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन भविष्यात राज्यातील कोणत्याही भूमिगत मेट्रो लाइनमध्ये पावसाचे पाणी शिरू नये याकरिता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

मुंबई मेट्रो लाईन-३ चा वांद्रे-कुर्ला संकुल (बीकेसी) ते आचार्य अत्रे चौक हा दुसरा टप्पा दिनांक १०.०५.२०२५ रोजी पासून सार्वजनिक वापरासाठी सुरु करण्यात आला.

(२) मुंबई मेट्रो मार्ग-३ ही कार्यान्वित झाल्यापासून आजपर्यंत नियमितपणे चालू आहे. दिनांक २६ मे, २०२५ रोजीच्या मुसळधार पावसामुळे आचार्य अत्रे चौक मेट्रो स्थानकाच्या बांधकामाधीन प्रवेश/निकास जवळील अग्निरोधक विभाजक भिंत बाधीत होऊन, पावसाचे पाणी स्थानकात शिरल्याने खबरदारीचा उपाय म्हणून प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने, वरळी ते आचार्य अत्रे चौक दरम्यानची मेट्रो सेवा दिनांक २६ मे, २०२५ ते दिनांक ३१ मे, २०२५ या कालावधीत तात्पुरती स्थगित करण्यात आली होती. परंतु, स्थानक संचलनाच्या कार्यासाठी आणि आचार्य अत्रे चौक स्थानकावरील क्रॉसओव्हरवरून गाड्यांची दिशा बदलण्यासाठी मेट्रो रुळ वापारात होते. त्यामुळे आरे जेव्हिएलआर ते वरळी दरम्यान मेट्रो सेवा सुरळीत कार्यरत राहिली.

(३) दिनांक २६ मे, २०२५ रोजी झालेल्या पर्जन्यदृष्टीमध्ये आचार्य अत्रे चौक मेट्रो स्थानकाच्या प्रवेश/निर्गम बाजूस बांधकाम चालू असलेल्या भागात बंद ठेवलेल्या पावसाच्या पाण्याचा नाला अचानक उघडला गेला. यासोबत उच्च भरतीची जोड मिळाल्याने स्थानकाच्या प्रवासी क्षेत्रात अनपेक्षितपणे पाण्याची गळती (Ingress) झाली.

भूमिगत प्रवेश/निर्गम स्थळी एका छोट्या बंधाऱ्यासारख्या भिंतीचे बांधकाम करण्यात आले होते, जे फक्त उघड्या खड्ड्यात थेट पडणारे पावसाचे पाणी अडवण्यासाठी होते. हा बंधारा अचानक उघडलेल्या नाल्यातून आलेल्या प्रचंड पाण्याच्या प्रवाहामुळे पाण्याची अचानक पातळी वाढल्यानंतर, सदरहू भिंत कोसळली. परंतू यामुळे कोणतीही तात्पुरती रचना (जसे सेकंट पाईल्स) किंवा कायमस्वरूपी कामाचा भाग (भिंती/स्लॅब) कोसळला नाही.

(४) व (५) मुंबई मेट्रो लाईन ३ मधील सर्व स्थानकांची रचना पूरपरिस्थितीचा सामना करण्यासाठी केलेली आहेत. तथापि, या ठिकाणी बांधकाम पूर्ण होईपर्यंत अशा घटना पुन्हा होऊ नयेत म्हणून खालील उपाययोजना करण्यात आल्या आहेतः

१) सर्व तात्पुरत्या बांधकाम प्रवेश बिंदूंचे त्वरित सीलिंग करण्यात आले आहे.

२) भूमिगत प्रवेशद्वारांच्या आजूबाजूच्या पाण्याच्या निचरा करणाऱ्या प्रणालीचे अधिक मजबुतीकरण करण्यात आले आहे.

३) उच्च क्षमतेचे संप पंप आणि सुधारित जलस्तर निरीक्षण प्रणाली तैनात करण्यात आली आहे.
४) आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ वापरासाठी आवश्यक उपकरणे आणि पंप ठिकाणीच उपलब्ध ठेवण्यात आले आहेत.
५) महत्वाच्या ठिकाणी डिझेल जनित्रांद्वारे वीज पुरवठ्यासाठी पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे.
६) सर्व कार्यरत मेट्रो लाईन्ससाठी पावसाळी तयारीसाठीची मानक कार्यपद्धती (SOPs) पुनरावलोकन करून सुधारित करण्यात आली आहे.
७) विशेषतः मुसळधार पावसाच्या कालावधीत पर्यवेक्षक आणि अधिकाऱ्यांकडून नियमित तपासण्या करण्यात येणार आहेत.

---

## गडचिरोली जिल्ह्यातील आष्टी ते सिरोंचा राष्ट्रीय महामार्गावर रस्त्याची झालेली दुरवस्था

**(३३) १२३४७ (२५-०८-२०२५). श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील आष्टी ते सिरोंचा महामार्गावर मुसळधार पावसामुळे महामार्गाची दुरवस्था झाली असल्याचे दिनांक १६ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोन वर्षापासून आष्टी ते सिरोंचा ३५३-सी या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरु असून तीन ते चार कंत्राटदार मिळून हे काम करत असून अल्टीमेटम दिल्यावरसुध्दा तसेच लोकप्रतिनीधींनी पुढाकार घेवून सुध्दा काम संथ गतीने सुरु असून काम अपूर्ण अवस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आष्टी ते सिरोंचा महामार्गावरुन ये-जा करणाऱ्या नागरीकांना तसेच एसटी बस चालकांना त्यामुळे अडचणीचा सामना करावा लागत असल्याने चिखलामुळे अनेक अपघात होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती उपायोजना केली तसेच रस्त्याचे काम पुर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (३०-०९-२०२५) :** (१) हे खरे नाही,

गडचिरोली-आष्टी-सिरोंचा राष्ट्रीय महामार्ग क्र.३५३-सी असून, सार्वजनिक बांधकाम (रा.म.) विभागामार्फत दर्जोन्नती /मजबुतीकरणाचे काम प्रगतीत आहे. दिनांक १६ मे, २०२५ रोजी मुसळधार पाऊस झाल्याची नोंद या विभागात नाही. दिनांक २७ मे, २०२५ रोजी झालेल्या आकस्मिक मुसळधार पावसामुळे उमानूर गावाजवळ सुमारे १ किमी. लांबीत रस्त्यावर चिखल होऊन वाहतुक काहीकाळ प्रभावित झाल्याचे निदर्शनास आले. सदर लांबीत रस्त्याचे बांधकाम प्रगतीत असून Subgrade (मुरूम) चे काम प्रगतीत होते. झालेल्या अवकाळी पावसामुळे Subgrade चे काम बाधित होऊन चिखल निर्माण झाला. कंत्राटदारामार्फत सदर चिखल २ तासाच्या आत रस्त्याच्या बाहेर काढण्यात आला. तसेच अशी परिस्थिती पुन्हा उद्भवू नये करिता खडीकरण करण्यात आले. सध्या करण्यात आलेल्या खडीकरणावरून वाहतूक सुस्थितीत सुरू आहे.
(२) आष्टी ते सिरोंचा रस्ता लांबी १३८ कि.मी., राष्ट्रीय महामार्ग क्र.३५३-सी मध्ये केंद्र शासनाकडून मंजूरी नुसार पाच भागामध्ये कामे प्रगतीत आहेत.

| भाग | कार्यारंभ आदेश | सद्य:स्थिती |
|---|---|---|
| आष्टी ते लगाम (१७.०५ कि.मी.) | २०.०१.२०२३ | काम पूर्ण |
| लगाम ते अल्लापल्ली (२८ कि.मी.) | ०९.०९.२०२३ | काम प्रगतीत (२१%) |
| अल्लापल्ली ते गुड्डीगुडम (१६ कि.मी.) | २३.११.२०२१ | काम प्रगतीत (२९%) |
| गुड्डीगुडम ते रेपनपल्ली (१९ कि.मी.) | २३.१२.२०२१ | काम प्रगतीत (६५%) |
| रेपनपल्ली ते सिरोंचा (५९ कि.मी.) | ०१.०६.२०२२ | काम प्रगतीत (४५%) |

लगाम ते सिरोंचा या भागामध्ये वन्यजीव अभयारण्य व व्याघ्र भ्रमणमार्गाची लांबी (४६.२२ कि.मी.) वगळता उर्वरित लांबीमध्ये रस्त्यांचे बांधकाम वेगवेगळया स्तरावर प्रगतीत असून रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे. वन विभागाकडून वेळोवेळी दिलेल्या निर्देशांनुसार रस्त्याचे काम सुरु आहे.

(३) आष्टी ते सिरोंचा महामार्ग वाहतूकीस योग्य असून वाहतूक सुरळीत सुरु आहे. चिखलामुळे अपघात झाल्याची नोंद दिसून येत नाही.

(४) व (५) लगाम ते सिरोंचा (१२२ किमी) हा रास्ता निर्माणाधीन आहे. या रस्त्याच्या एकूण लांबी पैकी ४६.२२ किमी लांबी वन्यजीव अभयारण्य व व्याघ्र भ्रमणमार्गामध्ये आहे. वन्यजीव अभयारण्य व व्याघ्र भ्रमणमार्गामध्ये रस्त्याचे काम करणे करिता NBWL च्या परवानगीची आवशक्ता आहे. NBWL ची परवानगी मिळवीणेकरितेचा प्रस्ताव वन विभागाकडे सादर केलेला आहे. मंजूरी प्राप्त झाल्यानंतर लवकरात लवकर काम पूर्ण करण्यात येईल. तसेच सातत्याने काम प्रगतीत असून जून २०२६ अखेर पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

---

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (एमएमआरडीए) "जायको"कडून वित्तसहाय्य मिळण्याबाबत**

**(३४) १२४८३ (०८-०९-२०२५). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील विविध विकासकामे पूर्ण करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (एमएमआरडीए) "जायको"कडून ४.०७ लाख कोटी रुपयांचे वित्तसहाय्य मिळणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वित्तसहाय्यातून कोण-कोणती विकासकामे करण्यात येणार आहेत, तसेच आतापर्यंत किती अर्थसहाय्य एमएमआरडीएला प्राप्त झाले आहे व उर्वरीत अर्थसहाय्य केंव्हापर्यंत प्राप्त होणे अपेक्षित आहे,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वित्तसहाय्यातून एमएमआरडीएला अर्थसहाय्य प्राप्त होण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-१२-२०२५) :** (१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकारणाद्वारे जायकाकडून रु. ४.०७ लाख कोटी रकमेचे घेतलेली बाब खरी नाही.

तथापि, प्राधिकरणाद्वारे इडिया ग्लोबल फोरम २०२५ या कार्यक्रमामध्ये खाली नमूद वित्तीय सोबत रु. ४.०७ लाख कोटी इतक्या रकमेचे सामंजस्य करार करण्यात आले आहे.

१) हाउसिंग अँड अर्बन डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (HUDCO) रु.१.५० लाख कोटी.

२) आर.ई.सी. लिमिटेड (REC Ltd.) रु.१ लाख कोटी.

३) पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड (PFC Ltd.) रु.१ लाख कोटी.

४) इंडियन रेल्वे फायनान्स कॉर्पोरेशन (IRFC) रु.५० हजार कोटी.

५) नॅशनल बँक फॉर फायनान्सिंग इन्फ्रास्ट्रक्चर अँड डेव्हलपमेंट (NaBFID) रु. ७ हजार कोटी.
(२), (३) व (४) सामजस्य करार केलेल्या वित्तीय संस्थाकडून उपलब्ध होणाऱ्या वित्तीय सहाय्यतून मेट्रो, रस्ते, उड्डाणपुल, नागरी सुविधा, तिसरी मुंबई विकास, इ. पायाभूत सुविधा प्रकल्पांची कामे करण्यात येणार आहेत. सद्यस्थितीत प्राधिकरणाने वित्तीय संस्थांबरोबर सामंजस्य करार केले असून अंतिम कर्ज मंजूरी करार पत्रांबाबत प्राथमिक स्तरावर बोलणी चालू आहे. आतापर्यंत कोणतेही अर्थसाहाय्य प्राधिकारणाला वित्तीय संस्थांकडून प्राप्त झालेले नाही. अंतिम कर्ज मंजूरी संबंधित प्रकल्पांची व्यवहार्यता व सखोल मुल्यमापन करण्याच्या अधिन राहुन प्रकल्पनिहाय कर्ज घेण्यात(Line of Credit) येणार आहे.

---

## संगमेश्वर (जि. रत्नागिरी) तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ च्या रुंदीकरणाच्या कामाबाबत

**(३५) १२९९२ (०८-०९-२०२५). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संगमेश्वर (जि. रत्नागिरी) तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ चे रुंदीकरणाचे काम ग्रामपंचायत तुरळच्या हद्दीत सुरू असून, या कामामुळे डिकेवाडी, सुवरेवाडी, मराठवाडी व हरेकरवाडी येथील नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागरिकांना शेतीसाठी महामार्ग ओलांडावा लागत असून, विद्यार्थ्यांचा देखील शाळा व महाविद्यालयांकरिता रस्त्यावरून प्रवास होत असून तसेच तुरळ बसस्टॉपवरून मोठ्या प्रमाणावर नागरिकांची ये-जा होत असून वाहतुकीचा मोठा वर्दळ असल्याने अपघाताचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ वरील तुरळ बसस्टॉप परिसरात पादचाऱ्यांसाठी ओव्हर ब्रिज बांधण्याबाबत तसेच डिकेवाडी ते हरेकरवाडी गणपती मंदिर दरम्यान दोन्ही बाजूंनी सर्व्हिस रोड तयार करण्याबाबत कोणती उपाययोजना करण्यात आली आहे,
(४) असल्यास, सदर सर्व्हिस रोडवर स्ट्रीटलाईट बसवण्याची कोणती योजना आखण्यात आली असून डिकेवाडी बैठक हॉल व सुवरेवाडी गणपती विसर्जन डोह परिसरात महामार्गालगत संरक्षक भिंती उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (२०-११-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

पनवेल-पेन-महाड-चिपळूण-राजापूर-कणकवली-गोवा हा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ असून या महामार्गाची रत्नागिरी जिल्ह्यातील लांबी ही राष्ट्रीय महामार्ग विभाग (सा.बां.) यांचे अखत्यारीत आहे. सदर ठिकाणाचे चौपदरीकरणाचे काम पूर्ण झालेले असून करारनाम्यामध्ये समाविष्ट हरेकरवाडी, मराठवाडी व सुवरेवाडी जंक्शनचे काम अद्याप प्रगतीत आहे. डिकेवाडी जंक्शनचे काम मूळ करारनाम्यात समाविष्ट नाही. तथापी करारनाम्यातील तरतुदीनुसार कंत्राटदारास सदर ठिकाणचे जंक्शन दुरुस्त करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. करारनाम्यात समाविष्ट जंक्शनच्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात खडीकरण करण्यात आलेले असून पावसाळ्यानंतर जंक्शनचे रुंदीकरण व आवश्यक सुधारणा करण्याचे नियोजन आहे.
(२) होय, हे अंशतः खरे आहे.

सदर ठिकाणी सन २०२५-२६ या वर्षात ०१ अपघात झालेला आहे. परंतु सदर ठिकाणी वाहतुकीच्या वर्दळीमुळे अपघाताच्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येत नाही.
(३) तुरळ बसस्टॉप येथील FOB आणि सेवारस्त्याचे काम मूळ करारनाम्यामध्ये समाविष्ट नाही. ग्रामस्थांच्या

मागणीनुसार तुरळ बसस्टॉप येथील FOB तसेच तुरळ येथील साखळी क्र. ८३.३०० ते ८४.४०० मधील सेवारस्त्याचे काम वार्षिक आराखडा २०२५-२६ मध्ये प्रस्तावित केले असून मंजुरीनंतर पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(४) सदर ठिकाणच्या सेवा रस्त्याचे काम मंजुर झाल्यानंतर स्ट्रीटलाईट संदर्भात आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजन आहे. डिकेवाडी बैठक हॉल ठिकाणी भरावाची उंची कमी असल्याने संरक्षक भिंत बांधण्यात आलेली नाही. सुवरेवाडी गणपती विसर्जन डोह परिसरात संरक्षण उपाययोजना म्हणुन क्रॅश बॅरिअर बसविण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील देवनार येथील कचराभुमी महानगरपालिकेच्या निधीमधून साफ करण्याचा घेतलेला निर्णय रद्द करण्याबाबत

**(३६) १३०५६ (१९-०९-२०२५). श्री.आदित्य ठाकरे (वरळी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनील राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील देवनार येथील कचराभूमी खाजगी विकासकास देण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निधीमधून सदरहू कचराभूमी साफ करण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेवर मोठ्या प्रमाणात आर्थिक बोजा पडणार असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिकेने उक्त निर्णय कोणत्या नियमानुसार घेण्यात आला असून, त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेला कोणता आर्थिक फायदा होणार आहे,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशतः खरे आहे.
(३) सदर निर्णय महानगरपालिकेने कचरा डेपो करिता असलेली देवनार येथील जमीन शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करून मूळ स्वरूपात देण्याबाबत पत्र क्र. जमीन-२६२४/प्र. क्रं. ज-३ दिनांक २४.०१. २०२५ द्वारे केलेली विनंती व घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ मधील तरतुदीनुसार घेण्यात आला आहे. या मध्ये बायोमायनिंग, रिसोर्स रिकव्हरी व सायंटिफिक रेमेडिएशनचा समावेश असून परिणामी कचरा भूमीवरील जागा भविष्यातील नागरी सुविधांसाठी उपलब्ध होणार आहे. तसेच जुना कचरा नष्ट करण्यामुळे प्रदूषण, आरोग्य विषयक समस्या, वायू व लिचेट स्राव अशा समस्यांवर तोडगा निघणार असून, दीर्घकालीन फायदे अधिक आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कराड येथे कृष्णा नदीलगत स्वतंत्र 'नेकलेस रोड' उभारण्याबाबत**

**(३७) १३१६२ (१८-०८-२०२५). श्री.अतुलबाबा भोसले (कराड दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे - बेंगलोर महामार्गावरुन कराड येथून सांगली जिल्ह्यातील विटा गावाकडे जाणारी सर्व वाहने कराड शहरातून पुढे जात नेहमी वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर पर्याय म्हणून कराड शहरातून विट्याकडे जाणाऱ्या वाहनांची वाहतूक, कराड येथील पंकज हॉटेल जवळून थेट हायवेवरून विट्याला जाणाऱ्या रस्त्याकडे वळविल्यास शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासाठी कराड येथील पंकज हॉटेलजवळून थेट हायवेवरून कृष्णा नदीला लागून स्वतंत्र 'नेकलेस रोड' उभारल्यास शहरातील वाहतुकीचा ताण कमी होऊन शहराच्या सौंदर्यात भर पडून कराड शहराच्या पर्यटनाला चालना मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हा नेकलेस स्वरुपाचा रस्ता स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिस्थळा जवळून जाणार असून त्यामुळे या स्मृतीस्थळाचा विकासही करणे शक्य आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१७-१०-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

गुहागर-चिपळूण-कराड-विटा-जत राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६-E हा राष्ट्रीय महामार्ग (सा.बां.) विभागाकडे आहे. हा महामार्ग कराड शहरातून जात असल्याने व सदर रस्ता कराड शहरातील मुख्य दळण-वळणाचा रस्ता असल्याने वाहतूक कोंडी टाळण्यासाठी चारपदरी केला असला तरी सद्यस्थितीत वाहतूक कालावधीत त्या लांबीमध्ये वाहतूक कोंडी होत असल्याचे निदर्शनास येते.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

तथापि, कराड येथील पंकज हॉटेलजवळून थेट हायवेवरून कृष्णा नदीला लागून स्वतंत्र 'नेकलेस रोड' हा दोन नद्यांच्या संगमानजिक तसेच पूर प्रवण क्षेत्रात येत असल्याने सदर रस्त्याबाबत अभ्यास करण्यासाठी प्रकल्प सल्लागाराची नियुक्ती करून तपशीलवार प्रकल्प अहवाल (Detailed Project Report) तयार करणे आवश्यक आहे. तसेच प्रस्तावित लांबीमध्ये अस्तित्वात रस्ता नसल्याने नव्याने मोठ्या प्रमाणावर भूसंपादन ही करावे लागणार आहे.

(५) व (६) उक्त प्रकरणी क्षेत्रीय स्तरावरून सदर रस्ता उभारण्याबाबत प्राथमिक सर्वेक्षण केले असता, सदरचा प्रस्तावित रस्ता हा दोन नद्यांच्या संगमानजिक येत असल्याने पूर प्रवण क्षेत्रामध्ये येतो. म्हणून सदर रस्ता बांधणेबाबतची शक्याशक्यता तपासणी करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करून तांत्रिक, पर्यावरणीय, आर्थिक बाबींचा सर्वोतोपरी विचार करूनच त्या अनुषंगाने, सदर रस्त्याचे आरेखन निश्चित करावे लागेल. सदर रस्त्याचा प्रकल्प केंद्रीय महामार्ग मंत्रालय (MoRT&H), नवी दिल्लीच्या पुढील वार्षिक आराखड्यात अंतर्भूत करण्यासाठी प्रस्तावित करण्यात येईल, मात्र सद्यस्थितीत सदरचा प्रकल्प सन २०२५-२०२६ च्या केंद्रीय महामार्ग मंत्रालय (MoRT&H), नवी दिल्लीच्या वार्षिक आराखड्यात अंतर्भूत नाही.

---

## भोकर येथील रस्ते सुधारणा करण्याबाबत

**(३८) १३२६२ (०८-०९-२०२५). ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्याच्या भोकर येथील एकुण ३५ रस्त्याची सुधारणा केली नसल्यामुळे नागरीकांसाठी गैरसोयीचे होत असल्याने सदर रस्त्यांची तात्काळ सुधारणा करण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाळ्यात हे रस्ते वाहतुकीसाठी त्रासदायक ठरत असल्याने सुधारणाची कार्यवाही तातडीने सुरु होणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन रस्ते सुधारणाच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१८-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

मा. श्री. अशोक चव्हाण, राज्यसभा सदस्य यांनी दिनांक २७.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये भोकर मतदार संघातील रस्ते व पुलाच्या कामांना अर्थसंकल्पामध्ये निधी मंजूर करण्याबाबत विनंती केली होती. सदर कामांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यक्षेत्रात २२ व जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या कार्यक्षेत्रात १३ कामे अंतर्भुत आहेत.

(२) व (३) प्रश्नांकित रस्त्यांची कामे निधी, निकष व प्राधान्यक्रम नुसार हाती घेण्याचे नियोजन राहील.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर जिल्ह्यातील दहेगाव रंगारी ते कामठी मार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(३९) १३३०५ (०८-०९-२०२५). डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील दहेगाव रंगारी ते कामठी मार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मार्गावर मोठ मोठ्या भेगा पडल्या असल्यामुळे मोठ्या प्रमाणात अपघाताचे प्रमाणही वाढल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मार्गाचे संरचनात्मक ऑडीट करण्यात आले आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०२-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.

नागपूर- दहेगाव- कामठी- वडोदा- कुही हा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २४७ असून देखभाल दुरुस्तीसाठी राष्ट्रीय महामार्ग (सा.बां) विभागाकडे आहे.

(२), (३) व (४) हे अंशतः खरे आहे.

सदर रस्त्यावरील काम पूर्ण झाल्यानंतर दोषदायित्व कालावधीमध्ये काही ठिकाणी कॉँक्रीटच्या रस्त्याला

पडलेल्या भेगा कंत्राटदारांकडून दुरुस्त करून घेण्यात आलेल्या आहेत. राष्ट्रीय महामार्गाचे काम प्राधिकृत अभियंता यांच्या देखरेखीमध्ये करण्यात आले असून कंत्राटदाराकडून दोषदायित्व कालावधीत दुरुस्ती करून घेण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक शहरात तब्बल ३१ हजार ८७३ नागरिकांना श्वानांचा त्रास असल्याबाबत**

**(४०) १३५३८ (०८-०९-२०२५). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गत वर्षात नाशिक शहरात तब्बल ३१ हजार ८७३ नागरिकांना श्वानांचा त्रास होत असल्याच्या घटना निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नाशिक शहरात मोकाट कुत्र्यांच्या नियंत्रणाकरिता महानगरपालिकेनी कोणती विशेष मोहिम हातात घेतली आहे, त्यांची अंमलबजावणी कशाप्रकारे करण्यात येत आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन मोकाट कुत्र्यांच्या नियंत्रणाकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०३-२०२६) :** (१) महानगरपालिका वैदयकीय विभाग कडील नोंदीनुसार मागील वर्षी २०२४-२५ या कालावधीत नागरीकांना श्वान दंश झाले बाबत संख्या १२५९८ इतकी आहे.
(२) व (३) महानगरपालिकेमार्फत Animal Welfare Board of India यांच्या मार्गदर्शक सूचनांअन्वये Registered संस्थेमार्फत Animal Birth control Program राबविण्यात येत आहे. यामध्ये पात्र संस्थे मार्फत मोकाट श्वान उचलून आणणे व त्यांचे निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे व ॲन्टीरेबीज लसीकरण करणे, शस्त्रक्रिया पश्चात देखभाल करणे व पुनःश्च त्याच ठिकाणी सोडणे बाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**सिध्दार्थ नगर, अंधेरी चार बंगला येथील वस्तीत नागरिकांना**
**मूलभूत सोयीसुविधा देण्यासंदर्भात**

**(४१) १३५७३ (१९-०९-२०२५). श्री.हारुन खान (वर्सोवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वर्सोवा सिध्दार्थ नगर, अंधेरी चार बंगला येथील वस्तीत अनेक दशकापासून रहात असलेल्या शेकडो कुटुंबाना शौचालय सुविधा, सांडपाणी व्यवस्था, कचरा व्यवस्थापन आणि वीज जोडणी यासारख्या मूलभूत सोयीसुविधा संदर्भात वारंवार महानगरपालिकेकडे अर्ज विनंती करुनही अद्यापही या सुविधा मिळालेल्या नसल्याबाबत निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन या वस्तीतील कुटुंबाना तातडीने मूलभूत सुविधा देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०८-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) अंधेरी (पश्चिम), स्थित सरदार वल्लभभाई पटेल नगर परिसरातील सिद्धार्थ नगर येथे सार्वजनिक शौचालय

बांधणेकरिता ना-हरकत देण्याच्या अनुषंगाने निवासी उप जिल्हाधिकारी (मुं.उ.जि.) यांनी दिनांक १७.०९.२०२५ रोजी पत्र निर्गमित करुन दिनांक २५.०९.२०२५ रोजी विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक व नगरभूमापन अधिकारी, अंधेरी यांजसोबत बैठक घेण्यात आली आहे. दिनांक ०७.१०.२०२५ रोजी जागेची संयुक्त पाहणीची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग, कोल्हापूर कार्यक्षेत्राबाहेर कार्यालय असल्याबाबत

**(४२) १३६३८ (२३-०८-२०२५). श्री.शिवाजी पाटील (चंदगड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड, आजरा, गडहिंग्लज, भुदरगड व राधानागरी तालुक्याकरिता असलेल्या विभागीय कार्यालय ह्या पाच तालुक्यांऐवजी कार्यक्षेत्राबाहेर कोल्हापुर येथे अस्तित्वात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक जनतेला कामाकरिता (नाहरकत पत्रे / अडचणी संदर्भात / निविदा / देयके इ.) विनाकारण कोल्हापूरच्या फेऱ्या माराव्या लागतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभागीय कार्यालय कोल्हापूर येथून चंदगड किंवा गडहिंग्लज येथे स्थलांतरीत करण्याबाबत कोणत्या अडचणी आहे,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१३-११-२०२५) :** (१) होय

(२) हे खरे नाही. सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर या मंडळांतर्गत सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग, कोल्हापूर या विभागाच्या कार्यक्षेत्रातील सर्व रस्ते व शासकीय इमारतींचे देखभाल व दुरुस्ती याबाबतची स्थापत्य कामे ही आंतरतालुकास्तरीय असून प्रशासकीय कामकाजासाठी विभाग व उपविभाग यांना एकत्रितपणे समन्वयाने काम करावे लागते. शासकीय कामकाजासाठी व लोकसेवेच्या हेतुने या विभागाचे कार्याक्षेत्रामध्ये उपविभाग कार्यालये त्या त्या तालुक्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी कार्यरत आहेत. त्यामुळे ठेकेदार अथवा नागरिकांना आवश्यक सेवा पुरविणेसाठी सदर उपविभागीय कार्यालये त्या त्या तालुक्याच्या ठिकाणी कार्यरत आहेत. तसेच नागरिकाना शक्यतो त्यांच्या कामाचा पाठपुरावा करणेसाठी अथवा कामाबाबत माहिती मिळवणेसाठी विभागीय कार्यालयात सहसा जास्त यावे लागत नाही. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडिल जास्तीत जास्त सेवा या ऑनलाईन पध्दतीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देणेत आलेल्या आहेत. तसेच ठेकेदार व नागरिकांना आवश्यक बहुतांश सेवा हया उपविभागीय कार्यालयामार्फतच पुरविणेत येत असल्याने कोल्हापूर येथे विभागाचे केवळ प्रशासकीय कार्यालय कार्यरत आहे. त्यामूळे उक्त मुद्यांचा विचार करता सद्य:स्थितीत ठेकेदार व नागरिक यांची कोणतीही गैरसोय होत असलेचे दिसून येत नाही. ठेकेदार व नागरिकांशी संबंधित असणारे विषय विभागाकडे आल्यास त्यांचा त्वरित निपटारा केला जातो व उपविभागीय कार्यालयामार्फत त्यांच्या मागणीबाबतची कार्यवाही सत्वर ज्ञात केली जाते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) लागू नाही.

---

## वसई तालुक्यातील (जि.पालघर) नायगाव पुर्व व पश्चिम बाजू जोडण्यासाठी एम.एम.आर.डी.ए. कडून बांधण्यात आलेल्या पुलावर होत असलेले अपघात

**(४३) १३७०९ (१९-०९-२०२५). श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई तालुक्यातील (जि.पालघर) नायगाव पुर्व व पश्चिम बाजू जोडण्यासाठी एम.एम.आर.डी.ए. कडून बांधण्यात आलेल्या पुलाचे क्रॅश बॅरीअर खुपच लहान असल्याने मागील काळात दुचाकीस्वारांचा दुचाकीसह पुलावरून खाली पडून मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत हे खरे आहे काय.

(२) असल्यास, पुलाच्या वळणावर वाहनांचा वेग कमी होण्यासाठी रम्ब्लर्स पटटया व दोन्ही दिशांना अविभाजित वाहतूक वेगळी करण्यासाठी रस्त्याच्या मध्यभागी कॅट आयस तसेच दिशादर्शक फलक बसविलेले नाहीत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुलावर Go Slow, Speed Limit, Accident Pron Area या साईन बोर्डची आवश्यकता असतांनाही ते लावले गेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित जबाबदार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन या कामांतील चुका व हलगर्जीपणामुळे घडलेल्या अपघाताविषयी तसेच अपघात रोखण्यासाठी तात्काळ कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

दिनांक ०८.११.२०२४ व दिनांक ०७.१२.२०२५ रोजी झालेल्या अपघातामध्ये दुचाकीस्वारांचा दुर्देवी मृत्यु झाल्याची बाब खरी आहे. तथापि, सदरहू अपघात हे भरधाव वेगाने तसेच निष्काळजीपणाने वाहने चालवल्याने झाल्याची पोलीस दफ्तरी नोंद आहे.

(२), (३), (४) व (५) नायगांव उड्डाणपूलाच्या पायाभुत सुविधा व सर्व आवश्यक सुरक्षा विषयक उपाय हे Indian Road Congress-६७ (IRC-६७) मधील तरतूदीनुसार करण्यात आले आहे. जसे की, वेगमर्यादा चिन्हे आणि दृश्यमान वेगमर्यादा चिन्हे स्पष्टपणे उड्डाणपूलाशी योग्य ठीकाणी लावण्यात आली आहेत, अपघात टाळण्यासाठी उड्डाणपूलाच्या होन्ही बाजूस ॲटीक्रॅश बॅरियर (Anti- Crash Barrier) बसवले आहेत, रिफ्लेक्टीव्ह रोड मार्किंग आणि थर्मो प्लास्टिक मार्किंग्स रात्रीच्या वेळी आणि प्रतिकुल हवामानात दृश्यमानता वाढविण्यासाठी करण्यात आलेले आहेत.

सदर नायगाव पुल हा प्राधिकरणामार्फत वसई-विरार नगरपालिकेस दिनांक २५.०३.२०२५ रोजी हस्तांतरीत करण्यात आला आहे,

त्यानुसार भविष्यात सदर रेल्वे ओव्हर ब्रिजवर अपघात घडू नये म्हणून महानगरपालिका, उप प्रादेशीक परिवहन अधिकारी व वाहतूक नियंत्रण पोलिस या संबंधित अधिकाऱ्यामार्फत संयुक्त स्थळ पाहणी करुन अतिरिक्त सुरक्षा उपाययोजना करण्याची आवश्यकता असल्यास महानगरपालिकेमार्फत त्याबाबतची तजवीज ठेवली आहे.

---

## आरमोरी (जि.गडचिरोली) येथील निराधार, जेष्ठ नागरिक व संघटनांनी संजय गांधी योजना, श्रावण बाळ व इतर निराधारांना वाढीव अर्थसहाय्याच्या मागणीबाबत

**(४४) १३९०६ (१८-०८-२०२५). श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **विशेष सहाय्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरमोरी (जि.गडचिरोली) येथील निराधार, जेष्ठ नागरिक व संघटनांनी संजय गांधी योजना, श्रावण बाळ व इतर निराधारांना मासिक ५ हजार रुपये अर्थसहाय्य द्यावे याकरिता माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्याची महागाई लक्षांत घेता या योजनांचे अर्थसहाय्य रक्कम रु.५ हजार करण्याबाबत व अन्य मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ (०२-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना या योजनेतील लाभार्थ्यांना दरमहा रु.१५००/- इतके अर्थसहाय्य डी.बी.टी पोर्टलद्वारे त्याच महिन्याच्या पहिल्या आठवड्यात देण्यात येत आहे.

संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना या योजनेतील दिव्यांग लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात रुपये १५००/- वरुन रुपये २५००/- इतकी वाढ विभागाच्या दिनांक १५ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात आलेली असून सदर वाढ माहे, ऑक्टोंबर २०२५ पासून देण्यात येत आहे. तसेच विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांच्या अर्थसहाय्यात वाढ करण्याची बाब शासन स्तरावर विचाराधीन नाही.

---

## राष्ट्रीय महामार्ग साकोली ते शिरपूरबांध या महामार्गावरील पूलाचे काम संथ गतीने सुरु असल्याबाबत

**(४५) १३९१६ (०८-०९-२०२५). श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वर साकोली ते शिरपूरबांध या महामार्गावरील (जि.गोंदिया) पूलाचे काम अग्रवाल ग्लोबल कंपनीतर्फे मागील पाच वर्षांपासून सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्यांचे काम अत्यंत संथगतीने सुरु असून त्यामुळे धूळ निर्माण होऊन वाहनचालक व नागरिकांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गेली ५ वर्षे हे काम अतिशय संथगतीने सुरु असल्यामुळे रस्त्यातील खड्डयांमुळे तेथील वाहनचालकांना, नागरिकांना मोठया प्रमाणावर धूळीमधून तासन्तास प्रवास करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन महामार्गावरील पूलाचे रस्त्याचे काम त्वरित पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०१-१२-२०२५) :** (१) ते (४) हे खरे नाही.

सदर पुल बांधकामाची किंमत ही रु. ३६० कोटी असुन सदर पुलाचे काम हे नोव्हेंबर २०२१ पासुन सुरू झालेले होते. सदर पुलाचे बांधकाम दिनांक २६/०४/२०२५ रोजी भौतीकदृष्ट्या पुर्ण झालेले आहे. तसेच सदर पुलावरून वाहतुक दिनांक २९/०३/२०२५ रोजी सुरू करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पिंपळशेत (ता.जव्हार,जि.पालघर) या पंचायत हद्दीत असलेल्या खरोंडा गावातील पूलाची तात्काळ दुरस्ती करण्याबाबत

**(४६) १४२७२ (२५-०६-२०२५). श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळशेत (ता.जव्हार, जि.पालघर) या पंचायत हद्दीत असलेल्या खरोंडा गावातील पूल मागील वर्षीच्या पूराने वाहून गेला असल्याने येथील नागरिकांची दैनंदिन वाहतूकीसाठी पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याचे माहे जून, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पूलाचे काम अद्यापपर्यंत अपूर्ण असल्याने येथील नागरिकांना, विद्यार्थ्यांना तसेच रुग्णांना उपचारासाठी तालुक्याच्या ठिकाणी जाण्यासाठी अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्यामुळे स्थानिक नागरिकांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त पूलाचे काम तातडीने पुर्ण करणेसह दोषी कंत्राटदार व याकडे दुर्लक्ष करणारे संबंधित अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (०७-०७-२०२५) :** (१) व (२) सदर रस्ता प्रजिमा दर्जाचा असून, खरोंडा गावाजवळ सा.क्र.कि.मी. ८/५०० येथील पुलाचा एका बाजूचा जोडरस्ता क्षतिग्रस्त झाला होता. सदर जोडरस्त्याचा भराव करुन, रस्ता दूचाकी वाहतूकीकरिता वापरात आहे.

खरोंडा येथील ग्रामस्थांना खुमारपाडा-वडपाडा-पिंपळशेत हा पर्यायी मार्ग वाहतूकीकरिता उपलब्ध आहे.

(३) सदर जागी नवीन पूल बांधणे करिता रक्कम रु.५.०० कोटी चे मंजूर कामाची निविदा प्रक्रीया पूर्ण करुन लवकरच काम हाती घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोकणातील राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या शाळा, महाविद्यालये व लोकवस्तीच्या सुरक्षिततेसाठी ओव्हरब्रिज व वेगमर्यादा नियंत्रणासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(४७) १४३३१ (०८-०९-२०२५). श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील अनेक माध्यमिक शाळा, महाविद्यालये व लोकवस्ती ही राष्ट्रीय महामार्गांच्या अत्यंत निकट वसलेली असून, या महामार्गांवरून भरधाव वेगाने वाहने धावत असल्याने विद्यार्थ्यांसह वयोवृद्ध व स्थानिक रहिवाशांच्या जीवितास धोका निर्माण होत असून अनेक ठिकाणी राष्ट्रीय महामार्गावर अपघातांची संख्या वाढत

असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यार्थ्यांची व स्थानिकांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी अशा ठिकाणी ओव्हरब्रिज किंवा अंडरपास उभारण्याच्या कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन वेगमर्यादा कमी करण्यासाठी आणि वाहनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्पीड ब्रेकर, सिग्नल यंत्रणा किंवा इतर तंत्रज्ञान बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१७-१०-२०२५) :** (१) हे अंशतः खरे आहे. तथापि वाहतुक सुरक्षित ठेवण्यासाठी कोकणातील मुख्य असलेल्या पनवेल-महाड-पणजी रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ व इतर राष्ट्रीय महामार्गावर करारनाम्यानुसार अनेक ठिकाणी अंडरपास तसेच Minor & Major Junctions देण्यात आलेले आहेत.
(२) पनवेल-महाड-पणजी रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ या राष्ट्रीय महामार्गाच्या करारनाम्यामध्ये अंतर्भूत असलेल्या इंदापूर ते परशुरामघाट या लांबीतील (कि.मी ८४/००० ते कि.मी. २०५/४००) सुमारे ३४ अंडरपासची तसेच ८५ Minor & Major Junctions कामे पूर्ण अथवा प्रगतीत आहेत. या शिवाय ०४ ठिकाणी पादचारी मार्ग (Foot Over Bridges) ची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. तसेच नागरिकांच्या मागणी नुसार ०३ ठिकाणी अंडरपासची व ०४ ठिकाणी पादचारी मार्ग (Foot Over Bridges) ची कामे नव्याने मंजूर करुन घेण्यात आली असून सदर कामे प्रगतीत आहेत. चिपळूण ते राजापूर दरम्यान एकूण १० ठिकाणी FOB (ओव्हरब्रिज) वार्षिक आराखडा २०२५-२६ मध्ये मंजुरीसाठी वरिष्ठ स्तरावर प्रस्तावित करण्यात आलेले असुन अद्याप मंजुरी प्राप्त नाही. प्रस्तावित कामांना मंजुरी प्राप्त होताच त्वरीत कामे विभागामार्फत सुरु करण्यात येतील.
(३) स्थानिक नागरिकांच्या मागणीनुसार आवश्यक त्या ठिकाणी रंबलर स्ट्रीप्स बसविण्यात आलेले आहेत. महामार्गाच्या लांबीमध्ये आवश्यक त्या ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीने डिझाईन स्पीड, स्पीड लिमिट बोर्ड व माहिती दर्शक फलक बसविण्यात आलेले आहेत, जेणेकरुन वाहतुकीवर नियंत्रण ठेवता येईल व अपघातांचे प्रमाण कमी होईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ऑनलाईन किराणा डिलिव्हरी सेवा देणा-या किराणाकार्ट टेक्नोलॉजीज प्रा.लि. (झेप्टा) या कंपनीकडून अन्नसुरक्षा नियमांचे झालेले उल्लंघन

**(४८) १४३४६ (१८-०८-२०२५). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ऑनलाईन किराणा डिलिव्हरी सेवा देणा-या किराणाकार्ट टेक्नोलॉजीज प्रा.लि. (झेप्टा) या कंपनीच्या धारावी येथील गोदामावर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) छापा टाकला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, या कंपनीकडून अन्नसुरक्षा नियमांचे उल्लंघन केले जात असल्याची बाब माहे जून, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन त्याअनुषंगाने संबंधित किराणाकार्ट टेक्नोलॉजीज प्रा.लि. (झेप्टा) या कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ (१९-१२-२०२५) :** (१) व (२) हे खरे आहे.

अन्न व औषध प्रशासनाने दिनांक ३१ मे २०२५ रोजी मे. किराणाकार्ट टेक्नोलॉजीज प्रा. लि. (Zepto), शॉप नं. ८, ८/A, गोल्डफिल्ड प्लाझा, सायन-बांद्रा लिंक रोड, धारावी, मुंबई या ई-कॉमर्स गोदामावर छापा टाकून अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत तपासणी केली. सदर तपासणीमध्ये सदर आस्थापनेत अस्वच्छतेसह गोदामात मुदत संपलेले खाद्यपदार्थ आढळले.

(३) मे. किराणाकार्ट टेक्नोलॉजीज प्रा. लि. (Zepto) या आस्थापनेच्या तपासणी दरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या पार्श्वभूमीवर सदर आस्थापनेचा परवाना तात्काळ निलंबित करण्यात आला. सदर आस्थापनेने परवाना निलंबन आदेशाविरुद्ध अन्न सुरक्षा आयुक्त यांचेकडे अपील दाखल केले. सदर परवाना निलंबन आदेशा वरील सर्व मुद्दयांची पुर्तता झाल्याची खातरजमा करुन अन्न सुरक्षा आयुक्त यांनी परवाना निलंबन आदेश रद्द केले आहेत. सदर आस्थापनेत आढळून आलेल्या मुदतबाह्य साठ्याच्या अनुषंगाने व तपासणी अहवालात नमूद उल्लंघनांच्या अनुषंगाने सदर आस्थापनेविरुद्ध न्यायनिर्णय अर्ज दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोंढारचिंचोली, ता.करमाळा ते डिकसळ, ता.इंदापूर दरम्यान उजनी जलाशयातील डिकसळ पुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(४९) १४४११ (०८-०९-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील कोंढारचिंचोली, ता.करमाळा ते डिकसळ, ता.इंदापूर दरम्यान उजनी जलाशयातील डिकसळ पुलाचे काही दिवसापासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पुलाचे काम करण्यासाठी ३६ महिन्याची मुदत दिलेली असतांना गेल्या २० महिन्यात केवळ १५ टक्केच काम पूर्ण झालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उजनी जलाशयातील डिकसळ पुलाचे संथ गतीने काम करणाऱ्या संबंधित ठेकेदारावर काय कारवाई केली वा करण्यात येणार आहे तसेच सदर पूलाचे काम मुदतीत पूर्ण होण्याच्या अनुषंगाने काय उपाययोजना करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (१७-१०-२०२५) :** (१) हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर पुलाचे काम तात्काळ पूर्ण करणेकामी संबंधित ठेकेदारास नोटीस देण्यात आलेली आहे. नदीपात्रात पाणी पातळी वाढलेनंतर Pile चे बांधकाम करणे शक्य होत नाही. या नैसर्गिक कारणास्तव काम करण्यास विलंब होत असल्याने ठेकेदारावर कार्यवाही करण्यात आलेली नाही.

उजनी धरणातील पाणीसाठा कमी झालेनंतर पुढील काम हाती घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातून जाणा-या राष्ट्रीय महामार्गावरील जातेगाव-टेंभुर्णी रस्त्याच्या रुंदीकरणामध्ये असमानता असल्याबाबत

**(५०) १४४१२ (२३-०८-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातून जाणा-या राष्ट्रीय महामार्ग क्र.५६१ वरील अहमतनगर-चापटगावपर्यंत ६० मीटरचा रस्ता करण्यात आलेला असतांना दुसरीकडे सदर महामार्गावरील जातेगाव-टेंभुर्णी दरम्यान मौजे मांगी जि. सोलापूर येथील गट नं.६६, ६७, २५८ व २५९ चे भूसंपादन व मोजणी ३० मीटप प्रमाणे करण्यात आली असून उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, करमाळा यांनी मोजणी करतांना चुका केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महामार्गावरील जातेगाव-टेंभुर्णी रस्त्यादरम्यान भूसंपादन तसेच रस्त्याच्या रुंदीकरणामध्ये असमानता असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक २१ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे तक्रार करुन महामार्गासाठी अहमदनगर जिल्ह्याप्रमाणे करमाळा तालुक्यात देखील ६० मिटर क्षेत्र भुसंपादन करुन शेतक-यांना त्याचा मोबदला देण्याची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन कार्यवाही करण्याच्या सुचना शासनाने प्रादेशिक अधिकारी, भारतीय राष्ट्रीय राज्यमार्ग प्राधिकरण यांना दिनांक १४ मे, २०२५ रोजी दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले (२९-०९-२०२५) :** (१) ते (३) अहिल्यानगर-करमाळा-टेंभुर्णी-पंढरपूर-मंगळवेढा हा राष्ट्रीय महामार्ग क्र.५६१ असून, अहिल्यानगर ते टेंभुर्णी रस्त्याचा भाग भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे अखत्यारित आहे. दिनांक २२/०९/२०२३ रोजी झालेल्या ११३ व्या भूसंपादन समिती (११३th LAC Meeting) च्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार आणि भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण मुख्यालय, नवी दिल्लीने दिनांक ०८/०२/२०२३ आणि ०९/०२/२०२३ रोजीच्या बैठकींमध्ये दिलेल्या निर्देशांनुसार सदर महामार्ग हे उपलब्ध असलेल्या आर.ओ.डब्लू (ROW) मध्ये नियोजित करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार सामान्य रस्ते बांधकामासाठी ३० मीटर आर.ओ.डब्लू. (ROW) आणि स्लिप रोड किंवा सेवा रस्त्यांची तरतूदी असलेल्या ठिकाणी ४५ मीटर आर.ओ. डब्लू. (ROW) घेण्यात आलेली आहे.

११३ व्या भूसंपादन समिती (११३th LAC Meeting) च्या शिफारशीनुसार प्रकल्पाची पुनर्रचना करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.